दैनिक
समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ७ वे अंक –८० गुरूवार दि.२६ नोव्हेंबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-7th Issue- 80 Thursday, Dt.26 November 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

सुट्ट्यांच्या काळात रक्ताचा ठणठणाट होऊ देऊ नका, रक्तदानासाठी समाजाने पुढे येण्याची वेळ..!

नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये रक्तसंकलन घटण्याची शक्यता, राज्य रक्त संक्रमण परिषदेचे सर्व रक्तपेढ्यांना विशेष शिबिरांचे निर्देश..?

मुंबई /प्रतिनिधी

रक्ताला जात नसते, धर्म नसतो, पक्ष नसतो आणि कोणतीही सीमा नसते! एखाद्या रुग्णाच्या शरीरातून वाहणारे रक्त थांबले, तर त्याला जीवनदान देण्यासाठी दुसऱ्या माणसाच्या रक्ताची गरज भासते. अशा वेळी रक्तपेढीत रक्त उपलब्ध नसणे, ही केवळ आरोग्य व्यवस्थेची समस्या नसून समाजाच्या संवेदनशीलतेचीही कसोटी असते. नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यात दिवाळी, नाताळ तसेच इतर सुट्ट्यांमुळे नियमित रक्तदात्यांची संख्या घटण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्य रक्त संक्रमण परिषदेने राज्यभर विशेष स्वैच्छिक रक्तदान शिबिरे आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत.

सण-उत्सव आणि सुट्ट्यांच्या काळात अनेक नियमित रक्तदाते बाहेरगावी जातात. महाविद्यालये, शैक्षणिक संस्था आणि कार्यालयांमधील नियमित उपक्रमांनाही काही प्रमाणात विराम मिळतो. परिणामी रक्तसंकलनाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता निर्माण होते. मात्र, रुग्णांचे अपघात होत नाहीत, शस्त्रक्रिया पुढे ढकलल्या जात नाहीत किंवा गंभीर आजारांवरील उपचार सुट्ट्यांमुळे थांबत नाहीत. थॅलेसेमिया, कर्करोग, गंभीर रक्तक्षय, प्रसूतीतील गुंतागुंत आणि अपघातग्रस्त रुग्णांना आवश्यकतेनुसार रक्त व रक्तघटकांची गरज भासतच असते. त्यामुळे रक्ताचा पुरेसा साठा राखणे ही आरोग्य व्यवस्थेची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे.

या पार्श्वभूमीवर राज्य रक्त संक्रमण परिषदेने राज्यातील सर्व रक्तपेढ्या आणि रक्तसंकलन केंद्रांना उपलब्ध रक्तसाठ्याचा आढावा घेऊन स्थानिक मागणीनुसार विशेष रक्तदान शिबिरे आयोजित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सामाजिक, राजकीय, धार्मिक संस्था, स्वयंसेवी संघटना, महाविद्यालये आणि विविध कार्यालयांच्या सहकार्याने रक्तसंकलन वाढविण्यावर भर देण्यात आला आहे.

मुंबईतील शासकीय रक्तकेंद्रांनी रेल्वे स्थानके, गर्दीची सार्वजनिक ठिकाणे, कार्यालये आणि गृहनिर्माण संस्थांमध्ये विशेष रक्तदान शिबिरे आयोजित करावीत. तसेच गृहनिर्माण संस्थांपर्यंत रक्तसंकलन वाहनांच्या माध्यमातून पोहोचून नागरिकांना रक्तदानासाठी प्रोत्साहित करावे, असेही निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक रक्तपेढीने आपल्या परिसरातील रक्ताची मागणी, उपलब्ध साठा आणि रुग्णांची गरज लक्षात घेऊन नियोजन करणे अपेक्षित आहे.

रक्तदान म्हणजे केवळ सामाजिक उपक्रम नव्हे, तर एखाद्याला जगण्याची संधी.!

रक्ताची निर्मिती कारखान्यात होत नाही. त्याला कोणताही कृत्रिम पर्याय उपलब्ध नाही. एका निरोगी व्यक्तीने स्वेच्छेने केलेले रक्तदान दुसऱ्या व्यक्तीच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करू शकते. विशेष म्हणजे रक्तदानातून मिळणाऱ्या रक्तावर आवश्यक तपासण्या करून त्याचे विविध रक्तघटक तयार केले जातात. त्यामुळे एका रक्तदानाचा उपयोग गरजेनुसार एकापेक्षा अधिक रुग्णांसाठी होऊ शकतो.

मात्र, रक्तदान करताना सुरक्षिततेचे नियम पाळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. साधारणतः १८ ते ६५ वर्षे वयोगटातील निरोगी व्यक्तींना वैद्यकीय तपासणीनंतर रक्तदान करता येते.





सामाजिक संस्था, महाविद्यालये, राजकीय संघटना आणि गृहनिर्माण संस्थांना रक्तदान चळवळ व्यापक करण्याचे आवाहन

रक्तदात्याची शारीरिक स्थिती, हिमोग्लोबिन आणि इतर आवश्यक निकष तपासूनच रक्त स्वीकारले जाते. रक्तदान हे पूर्णतः स्वैच्छिक आणि विनामोबदला असावे, यावरही आरोग्य यंत्रणेने भर दिला आहे.

राज्यातील नागरिकांनी आपल्या जवळच्या अधिकृत रक्तपेढीशी संपर्क साधून रक्तदान करावे. सामाजिक संस्था, युवक मंडळे, महाविद्यालये, पत्रकार संघटना, व्यापारी संघटना आणि राजकीय पक्षांनीही केवळ कार्यक्रमापुरते रक्तदान न ठेवता नियमित रक्तदानाची चळवळ उभी करावी. विशेषतः तरुणांनी या जीवनदायी कार्यात पुढाकार घेण्याची गरज आहे.

सुट्ट्या आनंदासाठी असतात पण कोणाचे तरी आयुष्य वाचविण्याची संधीही त्याच काळात मिळू शकते. सणांचा आनंद साजरा करताना रुग्णांच्या वेदना आणि त्यांच्या कुटुंबीयांची धडपड विसरता कामा नये. रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा पुरेसा साठा उपलब्ध राहणे ही केवळ शासनाची जबाबदारी नाही, तर प्रत्येक संवेदनशील नागरिकाचे सामाजिक कर्तव्य आहे.

राज्य रक्त संक्रमण परिषदेने केलेले आवाहन ही केवळ प्रशासकीय सूचना समजून दुर्लक्ष करण्याची बाब नाही. रक्ताच्या एका पिशवीसाठी रुग्णाच्या नातेवाइकांना दारोदार भटकण्याची वेळ येऊ नये, रक्ताअभावी कोणत्याही रुग्णाच्या उपचारात अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी समाजाने एकत्र येण्याची हीच वेळ आहे. कारण आपण दिलेले रक्त कदाचित एखाद्या अनोळखी व्यक्तीला नवजीवन देईल आणि त्याच्या कुटुंबाचा विझणारा संसार पुन्हा उजळवेल..!

फक्त पाच रुपयांत कार्ड रिचार्ज; एसटीच्या महिला, ज्येष्ठ प्रवाशांसाठी मोठा दिलासा!

मुंबई : प्रतिनिधी

एसटीने प्रवास करणा-या महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी दिलासादायक बदल करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी महामंडळ) नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड अर्थात एनसीएमसी कार्डच्या रिचार्ज पद्धतीत महत्त्वाचा बदल केला आहे.शहर शोधा

आता प्रवाशांना या कार्डमध्ये केवळ पाच रुपयांपासून रिचार्ज करता येणार आहे. तसेच पाच रुपयांच्या पटीत हवी तेवढी रक्कम जमा करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक सवलतधारकांना या निर्णयाचा विशेष फायदा मिळणार आहे.आता पाच रुपयांच्या पटीत रिचार्जची सुविधा एनसीएमसी कार्ड रिचार्ज करताना प्रवाशांना यापूर्वी अनेक अडचणी येत होत्या. रिचार्जसाठी आकारले जाणारे शुल्क आणि कार्डमध्ये प्रत्यक्ष जमा होणारी रक्कम यामध्ये फरक पडत होता. त्यामुळे प्रवाशांचे पैसे वाया जात असल्याच्या तक्रारी करण्यात येत होत्या. ही अडचण लक्षात घेऊन एसटी महामंडळाने रिचार्ज शुल्क व्यवस्थेत बदल केला आहे. आता पाच, दहा, १५, २० अशा पाच रुपयांच्या पटीत रिचार्ज करता येईल. आवश्यक तेवढीच रक्कम कार्डमध्ये जमा करता येणार असल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांना दिलासा मिळेल.

रिचार्ज शुल्कातही बदल

एनसीएमसी कार्डमध्ये टॉपअप करण्यासाठी अधिकृत एजंटला प्रत्येक व्यवहारामागे ११.८० रुपये कमिशन दिले जात होते. या रकमेत विविध करांचाही समावेश होता.

टँकरच्या मागणीत दुपटीने वाढ; धरणे कोरडी पडू लागली

मुंबई : प्रतिनिधी

यंदा एल-निनो प्रभावामुळे पाऊस कमी झाला. त्याचा परिणाम राज्यातील पाणी पातळीवर झालेला पाहायला मिळत आहे. एल-निनोचा प्रभाव आणखी वाढणार असल्याचे म्हटले जात आहे. अशातच राज्यातील काही धरणे कोरडी पडू लागल्याचे चित्र आहे. त्यामुळे टँकरची मागणी वाढली आहे. राज्यातील प्रमुख ३ हजार ४२ मोठ्या, मध्यम आणि लघु प्रकल्पांमध्ये एकूण ६३.७८ टक्के म्हणजेच ९२३.७४ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे.

राज्यातील दुष्काळाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. राज्यात विविध गावे आणि वाड्या-वस्त्यांना पाणी पुरवठा करणारे स्थानिक जलस्रोत आटू लागल्यामुळे टँकरच्या मागणीत वाढ होत आहे. गेल्या महिनाभरात टँकरच्या मागणीत दुपटीने वाढ झाली आहे. ११ जिल्ह्यांतील ११०२ गावे आणि ३ हजार ८०१ वाड्यांमध्ये १३२३ टँकरच्या माध्यमातून पाणी पुरवठा केला जात आहे. मराठवाड्यात सर्वाधिक ६६८ टँकरने पाणी पुरवठा केला जात असून बीड जिल्ह्यात सर्वाधिक ३२६ टँकर सुरू आहेत.

गतवर्षी याच दिवशी धरणांमध्ये ९०.४६ टक्के म्हणजेच १ हजार ३१०.१४ टीएमसी पाणीसाठा होता. यंदा गतवर्षीच्या तुलनेत ३८६.४१ टीएमसी पाणीसाठा कमी आहे. राज्यातील सहा महसुली विभागांतील धरणांमधील पाणीसाठ्याची स्थिती पाहता कोकण विभागात सर्वाधिक ८१.२३ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. पुणे विभागात ७४.५१ टक्के, नाशिक विभागात ७३.८० टक्के, नागपूर विभागात ५५.८१ टक्के, अमरावती विभागात ५२ टक्के, तर छत्रपती संभाजीनगर अर्थात मराठवाडा विभागात अवघा ३५.९१ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मराठवाड्यातील



पाण्याची स्थिती चिंताजनक आहे. नागपूर आणि अमरावती विभागातील सरासरी पाणीसाठा केवळ ५३.९० टक्के असल्याने विदर्भातही पाण्याचे नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे

पेपरफुटी करणाऱ्यांना आता १० कोटींचा दंड अन् १० वर्षे कारावास

मुंबई : राज्यातील शासकीय भरतीसाठी घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी, संघटित गैरप्रकार आणि परीक्षा प्रक्रियेतील भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी कठोर कायदेशीर उपाययोजना करण्याची शिफारस उच्चस्तरीय समितीने केली आहे. पेपरफुटीच्या संघटित गुन्ह्यांत सहभागी व्यक्ती आणि संस्थांना सात ते दहा वर्षांपर्यंत कारावास, किमान १० कोटी रुपयांचा दंड, नुकसानभरपाईची वसुली तसेच मालमत्ता जप्त करण्याची तरतूद करण्याची शिफारस समितीने केली आहे.



राज्य सरकारने नियुक्त केलेल्या या उच्चस्तरीय समितीच्या अध्यक्ष तथा सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे समितीचा दुसरा अंतरिम अहवाल सादर केला. शासकीय भरती प्रक्रियेतील पारदर्शकता वाढविणे आणि परीक्षांमधील गैरप्रकार रोखणे, हा या शिफारशींमागील प्रमुख उद्देश आहे.

दरम्यान, परीक्षा प्रक्रियेत गैरप्रकार घडल्यास उमेदवारांना आर्थिक दिलासा मिळावा, यासाठी संबंधित परीक्षेचे संपूर्ण शुल्क परत करण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) विचार करावा, अशीही शिफारस समितीने केली आहे. परीक्षा देण्यासाठी मेहनत, वेळ आणि पैसा खर्च करणाऱ्या उमेदवारांचे नुकसान टाळण्यासाठी हा पर्याय महत्त्वाचा ठरू शकतो.

पेपरफुटी आणि संघटित गैरप्रकारांमध्ये सहभागी असणाऱ्यांवर कठोर कारवाई, आर्थिक दंड, नुकसानभरपाई आणि मालमत्ता जप्तीच्या उपाययोजना प्रत्यक्षात लागू झाल्यास भरती परीक्षांमधील गैरप्रकारांना आळा घालण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे. मात्र, या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाकडून पुढे कोणते निर्णय घेतले जातात, याकडे परीक्षार्थी आणि उमेदवारांचे लक्ष लागले आहे.

वैभव सूर्यवंशीचा विश्वविक्रमी धमाका!

५२ चेंडूंमध्ये द्विशतक; २८ षटकारांची आतषबाजी

इंडिया 'अ' संघाचा ७ गडी राखून विजय

रायझिंग स्टार्स आशिया कपमध्ये १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने मंगळवारी स्फोटक फलंदाजी करत क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधून घेतले. त्याने अवघ्या २८ चेंडूंमध्ये शतक आणि ५२ चेंडूंमध्ये द्विशतक झळकावल्याचा विश्वविक्रमी पराक्रम केला.

युएईविरुद्धच्या सामन्यात वैभव ५३ चेंडूंमध्ये २०४ धावा करून बाद झाला. त्याच्या या वादळी खेळीत तब्बल २८ षटकार आणि ७ चौकारांचा समावेश होता. त्याच्या आक्रमक फलंदाजीमुळे इंडिया 'अ' संघाने विजयाचे लक्ष्य अत्यंत कमी वेळेत गाठले.युएईने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकांत ९ गडी गमावून २४९ धावा केल्या. हरप्रीत सिंग भाटियाने १३० धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. त्याने १२ चौकार आणि ४ षटकार मारले.

प्रत्युत्तरात इंडिया 'अ' संघाने वैभव सूर्यवंशीच्या धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर २५० धावांचे लक्ष्य अवघ्या १४.२ षटकांत ३ गडी गमावून पूर्ण केले. या विजयामुळे इंडिया 'अ' संघाने रायझिंग स्टार्स आशिया



कपमध्ये युएईवर ७ गडी राखून मात केली. वैभवच्या या खेळीने स्पर्धेत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
संपादकीय
गुरूवार दि.२६ नोव्हेंबर २०२६
THURSDAY, DT.26 NOVEMBER 2026
पान –२
PAGE - 2

संपादकीय....

इंधन बचतीचा इशारा की देशापुढील आर्थिक संकटाची चाहूल.?

आज काटकसर केली नाही तर उद्या इंधनासाठी मोठी किंमत मोजावी लागेल.!

बीड : देशाचा विकास आणि अर्थव्यवस्थेची गती कायम ठेवण्यासाठी इंधनाची उपलब्धता अत्यंत महत्त्वाची आहे. पेट्रोल, डिझेल आणि गॅस हे आज शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक आणि सामान्य माणसाच्या जीवनाचे अविभाज्य घटक बनले आहेत. त्यामुळे इंधनाचा अपव्यय हा केवळ आर्थिक नुकसानाचा विषय नसून देशाच्या आर्थिक सुरक्षिततेशी जोडलेला गंभीर प्रश्न आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह महाराष्ट्रातील मंत्री, लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी वाहनांचे ताफे कमी करून इंधन बचतीचा संदेश दिला आहे. हा पुढाकार स्वागतार्ह असला तरी इंधन बचत ही केवळ सरकारी यंत्रणेपुरती मर्यादित न राहता प्रत्येक नागरिकाची जबाबदारी बनली पाहिजे.

आयातीवरील अवलंबित्व चिंतेचा विषय.!

भारताला लागणाऱ्या कच्च्या तेलापैकी मोठा हिस्सा परदेशातून आयात करावा लागतो. २०२४-२५ मध्ये भारताची कच्च्या तेलाची आयात सुमारे २४३.२ दशलक्ष मेट्रिक टन होती. एकूण गरजेपैकी जवळपास ८७.८ टक्के तेल आयातीवर अवलंबून होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातील दरवाढ, युद्धजन्य परिस्थिती किंवा तेलपुरवठ्यातील अडथळे भारताच्या अर्थव्यवस्थेला प्रभावित करू शकतात.सध्या देशात पेट्रोल-डिझेलची टंचाई असल्याचे चित्र नाही. मात्र भविष्यातील संभाव्य संकट, वाढती मागणी आणि आयातीवरील अवलंबित्व लक्षात घेता आजपासूनच इंधन बचतीची सवय लावणे आवश्यक आहे.

युद्धाची झळ सामान्य माणसापर्यंत.!

पश्चिम आशियातील संघर्ष आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीसारख्या महत्त्वाच्या सागरी मार्गांवरील तणावामुळे तेलपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता असते. आंतरराष्ट्रीय बाजारात तेल महागले तर भारताचा आयात खर्च वाढतो. त्याचा परिणाम वाहतूक, शेती, उद्योग आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर होऊ शकतो. डिझेल महागल्यास शेतकऱ्यांच्या मशागतीपासून शेतमालाच्या वाहतुकीपर्यंत सर्वच खर्च वाढतात. अखेरीस त्याचा भार सामान्य कुटुंबावर पडतो.

सरकारी ताफे कमी झाले, आता जनतेनेही पुढाकार घ्यावा.!

मंत्र्यांनी आणि अधिकाऱ्यांनी वाहनांचे ताफे कमी करणे ही चांगली सुरुवात आहे. मात्र हा उपक्रम केवळ प्रसिद्धीपुरता न राहता कायमस्वरूपी झाला पाहिजे. अनावश्यक दौरे टाळणे, सामायिक वाहनांचा वापर, शक्य तेथे ऑनलाइन बैठका आणि सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य देणे आवश्यक आहे.सामान्य नागरिकांनीही जवळच्या अंतरासाठी पायी चालणे, सायकल वापरणे, कारपूल करणे आणि वाहनांचे इंजिन विनाकारण सुरू न ठेवणे अशा छोट्या सवयी अंगीकारल्या पाहिजेत.

इंधन बचतीतून पर्यावरणाचेही संरक्षण.!

इंधनाचा अतिवापर म्हणजे प्रदूषण आणि कार्बन उत्सर्जनात वाढ. त्यामुळे इलेक्ट्रिक वाहने, सौरऊर्जा, जैवइंधन आणि सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. सरकारने पर्यायी ऊर्जेच्या सुविधा वाढवतानाच सर्वसामान्यांना परवडणारे पर्याय उपलब्ध करून दिले पाहिजेत.

आजची बचत, उद्याची सुरक्षितता.!

इंधन बचतीच्या नावाखाली भीती किंवा अफवा पसरवणे चुकीचे आहे. मात्र इंधनाचा पुरवठा सुरळीत आहे म्हणून त्याचा अमर्याद वापर करणेही योग्य नाही. सरकारने देशांतर्गत तेल उत्पादन, आपत्कालीन इंधन साठवणूक आणि पर्यायी ऊर्जेच्या विकासावर भर द्यावा.शेवटी, इंधन बचत ही केवळ सरकारची जबाबदारी नाही, तर प्रत्येक भारतीयाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. पंतप्रधानांपासून सामान्य नागरिकांपर्यंत प्रत्येकाने स्वत:पासून सुरुवात केली तर मोठी बचत शक्य आहे.कारण आज वाचवलेला इंधनाचा प्रत्येक थेंब उद्याच्या भारताच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी मोलाचा ठरणार आहे. संकट येण्याची वाट पाहण्यापेक्षा संकट टाळण्यासाठी आजच काटकसर करणे हीच खरी राष्ट्रभक्ती.!

दुष्काळात टँकर निर्मिती उद्योगाला 'सुगीचे दिवस'

गेवराई तालुक्यात दोन महिन्यांत शेकडो ऑर्डर्सची नोंद, व्यावसायिकांची चांदी

बीड – बीड जिल्ह्यात यंदा पावसाने दडी मारल्याने भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची वणवण सुरू असून, प्रशासन आणि खासगी स्तरावरून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. एका बाजूला दुष्काळामुळे शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले असतानाच, दुसऱ्या बाजूला या पाणीटंचाईने जिल्ह्यातील टँकर निर्मिती उद्योगाला मात्र अनपेक्षितपणे 'सुगीचे दिवस' आले आहेत. सध्या एका टँकरच्यासाठी सव्वा लाख रुपये मोजावे लागत असून, मागणी इतकी वाढली आहे की कारखानदारांना रात्रंदिवस काम करावे लागत आहे. दोन वर्षांत जिल्ह्यात समाधानकारक पाऊस झाल्याने पाण्याचे स्रोत तुडुंब भरले होते. त्यामुळे टँकरची गरज भासली नाही आणि टाकी निर्मितीचे कारखाने जवळपास ठप्प होते. मात्र, यंदाच्या दुष्काळाने हे चित्र पूर्णपणे पालटले आहे. शासकीय टँकरसोबतच



खासगी टँकर चालकांकडून नवीन टाक्या बनवून घेण्यासाठी गर्दी होत आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे आलेल्या दुष्काळाने जनतेचे हाल वाढवले असले, तरी जिल्ह्यातील वेल्डिंग वर्कशॉप्स, फॅब्रिकेशन व्यावसायिक आणि संबंधित कामगारांच्या हाताला या निमित्ताने रोजगार उपलब्ध झाला . मागील दोन वर्षे चांगला पाऊस झाल्यामुळे टँकर निर्मितीची मागणी नव्हती. परंतु यंदाच्या दुष्काळामुळे ऑर्डर्स येऊ लागल्या आहेत. गेल्या दोन महिन्यांत माझ्याकडे टँकर बनविण्याच्या २५ ऑर्डर्स आल्या आहेत. – विक्रम यमगर, टँकर निर्मिती व्यावसायिक, गढी, ता. गेवराई

टँकरच्या किमती वाढण्यामागे केवळ स्थानिक मागणीच नाही, तर आंतरराष्ट्रीय घडामोडीही कारणीभूत ठरत आहेत. आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक बाजारपेठेत कच्च्या मालाचा पुरवठा विस्कळीत आहे. याचा थेट परिणाम पोलादाच्या किमतीवर झाला असून, पोलादाचे दर जवळपास ३० ते ३५ टक्क्यांनी वधारले आहेत. व्यावसायिकांना आर्थिक भार सोसावा लागत आहे.

दुष्काळात जनतेची सेवाभावी वृत्तीने मदत करा – बदामराव पंडित

गेवराई (प्रतिनिधी)

सध्या राज्यात आणि विशेषतः मराठवाड्यात भीषण पाण्याची टंचाई आहे आपल्या बीड जिल्ह्यात चारा आणि पाण्याचाही गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. या दुष्काळाकडे संधी म्हणून न पाहता, सेवाभावी वृत्तीने जनतेची मदत करण्यासाठी भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सदैव तत्पर रहावे असे आवाहन भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे.

भाजपच्या संघटनात्मक बळकटीसाठी आणि घराघरात भाजपा पक्षाचे विचार पोहोचवण्यासाठी गेवराई शहरात भाजप नियोजन बैठकीचे आयोजन दिनांक २१ नोव्हेंबर २०२६ रोजी भाजपा कार्यालय राजवर्धन कॉम्प्लेक्स येथे करण्यात आले होते. या बैठकीला भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, नगराध्यक्ष सौ गीताभाभी पवार, भाजपा मराठवाडा समन्वयक श्रीकांत सानप, भाजपा जिल्हा सचिव रोहित पंडित, युवा नेते यशराज पंडित, जिल्हा उपाध्यक्ष पी टी चव्हाण, अमोल वडतीले, सचिन उबाळे, प्रकाशराव सुरवसे आर्दीची प्रमुख उपस्थिती होती.

भाजपच्या जिल्हा सचिव पदी रोहित पंडित यांची निवड झाल्याबद्दल तालुका भाजपच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ देऊन व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की, यावेळी बीड जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघातील सर्वच गावांना पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. अनेक गावात टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. जनावरांच्या पाण्याचा आणि चाऱ्याचा मोठा प्रश्न येणाऱ्या काळामध्ये निर्माण होणार आहे. यावर मात करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार पूर्ण ताकतीने प्रयत्न करत आहे. अशावेळी या दुष्काळाला संधी म्हणून न पाहता जनतेची सेवाभावी वृत्तीने मदत करण्याची भूमिका संघटनात्मक एकत्र येऊन भाजपच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पार पाडावी. भाजप नेत्या, पर्यावरण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात होणाऱ्या संभाव्य निवडणुकीत शतप्रतिशत भाजपा करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे असे आवाहन केले.जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख आणि जिल्हा सचिव रोहित पंडित यांनी गेवराई तालुक्यातून शतप्रतिशत भाजपच्या विजयासाठी संघटन मजबूत करण्यावर भर देण्याच्या सूचना केल्या. जनसेवेच्या माध्यमातून भाजपसोबत कार्यकर्त्यांची मजबूत साखळी उभा करण्यावर आणि घराघरात भाजपा पक्षाचे विचार पोचविण्यासाठी काम करण्याचे आवाहनही त्यांनी पदाधिकाऱ्यांना केले.

प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्यांना पुन्हा संधी

३० नोव्हेंबरपर्यंत गणना प्रपत्र भरण्याची मुदत

मुंबई : विशेष सखोल पुनरीक्षण (डखठ)एसआयआर कार्यक्रमांतर्गत प्रारूप मतदार यादीत नाव समाविष्ट न झालेल्या पात्र नागरिकांना पुन्हा एकदा संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगाने अशा नागरिकांसाठी नव्याने गणना प्रपत्र भरण्याची सुविधा सुरू केली आहे. अनुपस्थित, स्थलांतरित, मृत आणि दुबार (–डऊळ) प्रवर्गातील मतदारांसाठी गणना प्रपत्रांचे वितरण आणि संकलन ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.



महाराष्ट्रातील सर्व विधानसभा मतदारसंघांच्या प्रारूप मतदार याद्या ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. निवासस्थानी उपलब्ध नसल्यामुळे किंवा गणना प्रपत्र भरून न दिल्यामुळे ज्या नागरिकांची नावे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट झाली नाहीत, अशा मतदारांची यादी मुख्य निवडणूक अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या अधिकृत संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. संबंधित मतदान केंद्रांवरही या याद्या पाहता येणार आहेत.

बीएलओकडून मतदारांशी संपर्क

प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र नागरिकांना नव्याने गणना प्रपत्र भरून नाव समाविष्ट करण्यासाठी अर्ज करता येणार आहे. यासाठी संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (इडज) अनुपस्थित आणि स्थलांतरित मतदारांशी संपर्क साधून गणना प्रपत्र भरून घेणार आहेत.

पवरूनही ऑनलाइन सुविधा

मतदारांना एउखछएढ पवर उपलब्ध असलेल्या ई-साइन (ए-ीळसप) सुविधेच्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीनेही गणना प्रपत्र सादर करता येणार आहे. त्यामुळे प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र नागरिकांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी पुन्हा संधी मिळणार आहे.



शेळ्या-मेंढ्यांसाठी चारा व पाणी छावण्या तात्काळ सुरू करा

प्रकाश सोनसळे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

बीड (प्रतिनिधी)

राज्यातील अनेक भागात दुष्काळजन्य परिस्थिती असून याचा मोठा फटका शेतकरी आणि मेंढपाळ बांधवांना बसत आहे. शेळ्या-मेंढ्यांसाठी पुरेसा चारा उपलब्ध नसल्याने तसेच पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्याने मेंढपाळ बांधवांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

मेंढपाळ समाजातील बांधव आपल्या शेळ्या-मेंढ्यांना घेऊन रानावनात भटकंती करत असतात अनेक मेंढपाळांकडे १०० ते २०० शेळ्या-मेंढ्या असून, सध्याच्या परिस्थितीत त्यांच्या चाऱ्याची आणि पाण्याची व्यवस्था करणे अत्यंत कठीण झाले आहे. चारा आणि पाण्याअभावी पशुधनाच्या जगण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर बीड शहरालगत धनगर समाज संघटन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष प्रकाश सोनसळे यांनी मेंढपाळ बांधवांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी मेंढपाळ बांधवांनी आपली व्यथा मांडताना शासनाने तातडीने शेळ्या-मेंढ्यांसाठी चारा छावण्या सुरू कराव्यात तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी केली.

मेंढपाळ बांधवांच्या या गंभीर समस्येकडे महाराष्ट्र शासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील मेंढपाळ समाजाच्या न्यायाच्या मागणीची दखल घेऊन शेळ्या-मेंढ्यांसाठी स्वतंत्र चारा छावण्या सुरू कराव्यात आणि पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी अशी मागणी यावेळी प्रकाश सोनसळे यांनी केली यावेळी मोठ्या संख्येने मेंढपाळ बांधव उपस्थित होते.



बालसुरक्षेसाठी शिक्षणविभाग व शिक्षक सज्ज

परळी / प्रतिनिधी

मुलांच्या सुरक्षिततेसाठी आणि बाल लैंगिक शोषणास प्रभावी प्रतिबंध घालण्यासाठी शाळास्तरावर 'बाल लैंगिक शोषण व वैयक्तिक सुरक्षा शिक्षण' कार्यक्रम अधिक सक्षमपणे राबविण्याच्या उद्देशाने परळी येथे चार दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ झाला आहे. अर्पण संस्था, मुंबई आणि महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ नोव्हेंबर २०२६ ते २८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत दररोज सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत हे प्रशिक्षण डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अकॅडमी माधव बाग परळी येथे आयोजित करण्यात आले आहे. मुख्याध्यापक व शिक्षकांना बालसुरक्षेच्या दृष्टीने सुसज्ज करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असून उद्घाटन सत्रात परळी गटसाधन केंद्राच्या गट शिक्षणाधिकारी हिना अन्सारी मॅडम, विस्तार अधिकारी गोविंद कराड आणि तालुका प्रशिक्षण समन्वयक बाळासाहेब दहिफळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यासोबतच अर्पण संस्था, मुंबई येथील तज्ज्ञ मार्गदर्शक सुशील मोहिते, सलोनी राणे निलय अगलावे, दिशा पाटील, संकेत शिंदे, नोविना लिमोस तसेच तालुक्यातील विविध केंद्रांचे केंद्र प्रमुख उपस्थित होते.

प्रशिक्षणादरम्यान शाळांमध्ये राबवावयाच्या कृती आराखड्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. त्यानुसार प्रशिक्षित शिक्षकांनी आपल्या शाळांमध्ये बाल लैंगिक शोषण प्रतिबंध व वैयक्तिक सुरक्षा शिक्षणावर आधारित पालक-जागरूकता सत्र तसेच विद्यार्थ्यांसोबत वैयक्तिक सुरक्षा शिक्षण सत्र आयोजित करणे, या सत्रांची संकलित माहिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या संकेतस्थळावरील लिंकद्वारे किंवा दिलेल्या क्यू आर कोडच्या माध्यमातून भरणे अनिवार्य करण्यात आले आहे. या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यासाठी अर्पण संस्थेचे प्रतिनिधी थेट शालेय स्तरावर भेटी देऊन विद्यार्थी व पालक सत्रांच्या आयोजनात सहकार्य करणार आहेत. तसेच प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष परिणाम तपासण्यासाठी प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर संस्थेचा प्रशिक्षण सहायक विभाग शिक्षकांना मुले व प्रौढांसोबत झडए सत्रे घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करेल. शाळांमध्ये हा उपक्रम अधिक परिणामकारक व्हावा, यासाठी वर्ग निरीक्षण, चर्चासत्रे आणि दूरध्वनीद्वारे संवाद यांसारख्या माध्यमांतून शिक्षकांना सातत्याने प्रोत्साहन दिले जाणार आहे.

प्रशिक्षण कालावधीत गट शिक्षणाधिकारी हिना अन्सारी मॅडम यांच्यासह इतर शिक्षण अधिकारी व कर्मचारी पूर्ण वेळ प्रशिक्षण स्थळी उपस्थित राहून प्रशिक्षण सुरळीत व यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेत आहेत. परळी तालुक्यातील बालसुरक्षा चळवळीला या प्रशिक्षणातून नवी दिशा मिळेल, असा विश्वास प्रशिक्षणार्थी शिक्षक वर्गातून व्यक्त करण्यात आला.



डिघोळआंबा शिवारातील कोरड्या तलावात अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळला!

५० ते ५५ वयोगटातील व्यक्तीची ओळख पटविण्याचे युसूफ वडगाव पोलिसांचे आवाहन ; नागरिकांनी संपर्क साधण्याचे आवाहन

केज/प्रतिनिधी

केज-अंबाजोगाई परिसरात खळबळ उडवणारी घटना समोर आली असून,युसूफ वडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे डिघोळआंबा शिवारात कळंब-अंबाजोगाई राज्य महामार्गालगत असलेल्या कोरड्या तलावामध्ये एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला आहे.अंदाजे ५० ते ५५ वर्षे वयोगटातील या व्यक्तीची अद्याप ओळख पटलेली नसून संबंधित व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी युसूफ वडगाव पोलिसांनी नागरिकांना पुढे येण्याचे आवाहन केले आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर मृत व्यक्तीच्या अंगात पांढऱ्या रंगाचा फाटलेला व अर्धवट जळालेला सदरा होता. तसेच ग्रे रंगाची चड्डी असून,त्यावर काळ्या व पिवळ्या रंगाचे पट्टे आहेत.चड्डीला लाल रंगाच्या कापडाचे ठिगळ लावलेले आहे. व्यक्तीच्या कमरेला लाल रंगाचा करदोडा असून,त्याला काळ्या, पांढऱ्या व पोपटी रंगाच्या तीन चाव्या असलेला दोर बांधलेला आढळून आला आहे.

याशिवाय मृतदेहाच्या बाजूला काळ्या रंगाच्या चामड्याच्या शूजची जोडी आढळली आहे.तसेच लाल चौकडीचा रुमाल असून,त्यामध्ये डेटॉल व मेडिमिक्स साबण आढळून आले आहेत. या वस्तूंच्या आधारे संबंधित व्यक्तीची ओळख पटविण्याचा प्रयत्न पोलीस करीत आहेत.

सदर वर्णनाशी मिळती जुळती व्यक्ती आपल्या गावातून,परिसरातून किंवा कुटुंबातून बेपत्ता झाली असल्यास नागरिकांनी तातडीने युसूफ वडगाव पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा,असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे यांनी केले आहे.या व्यक्तीची ओळख पटविण्या साठी नागरिकांनी दिलेली माहिती पोलिसांसाठी महत्त्वाची ठरू शकते. त्यामुळे कोणाकडेही संबंधित व्यक्तीबाबत माहिती असल्यास ती पोलिसांना कळवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



दुष्काळावर मात करण्यासाठी 'सकाळ'चा जलसंधारणाचा पुढाकार; कोळवाडीत

नदी पुनरुज्जीवनाला प्रारंभ

सकाळ रिलीफ फंडातून मराठवाड्यातील पहिला, तर बीड जिल्ह्यातील पहिला प्रकल्प; कोल्हापुरी बंधाऱ्यातील गाळ काढण्यास सुरुवात

मानूर प्रतिनिधी ह्न

शिरूरकासार तालुक्यात निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी दैनिक सकाळने जलसंधारणाचा पुढाकार घेतला आहे. सकाळ रिलीफ फंडातून कोळवाडी येथील सिंदफणा नदीवरील कोल्हापुरी बंधाऱ्यातील गाळ काढण्याच्या कामाचा शुभारंभ मंगळवारी (ता. २४) मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. मराठवाड्यातील पहिला आणि बीड जिल्ह्यातील पहिला सकाळ रिलीफ फंडाचा हा प्रकल्प ठरला आहे.

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने शिरूरकासार तालुक्यात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. गावोगावी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची वेळ आली असून, पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होत आहे. या पार्श्वभूमीवर केवळ पाणीपुरवठ्यावर अवलंबून न राहता उपलब्ध जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आणि जलसाठा वाढविण्यासाठी दैनिक सकाळने सकाळ रिलीफ फंडातून जलसंधारणाची कामे हाती घेतली आहेत. त्याचाच भाग म्हणून कोळवाडी येथील सिंदफणा नदीपात्रातील कोल्हापुरी बंधाऱ्यातील गाळ काढण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या कामामुळे बंधाऱ्याची पाणी साठवण क्षमता वाढण्यास मदत होणार असून, परिसरातील जलस्रोतांना बळकटी मिळण्याची अपेक्षा आहे.

यावेळी तहसीलदार सुरेश घोळवे, गटविकास अधिकारी भरत नागरे, कृषी अधिकारी अमृत गांगुर्डे, सकाळचे जिल्हा बातमीदार नितीन चव्हाण, शिरूरकासारचे बातमीदार चंद्रकांत राजहंस, मा. जिल्हा परिषद सदस्य शिवाजी पवार, नगरपंचायतीचे गटनेते गणेश भांडेकर, सरपंच पूजा नेटके, उपसरपंच नारायण मानकर, नाम फाउंडेशनचे समन्वयक शिवाजी वाघले, पाणी फाउंडेशनचे समन्वयक विशाल घोलप, पत्रकार बबनराव देशमुख, सुधाकर नेटके, साईनाथ नेटके, देविदास नेटके,चंद्रकांत नेटके ,कविता ढाकणे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. सकाळ रिलीफ फंड, नाम फाउंडेशन आणि ग्रामस्थांच्या लोकसहभागातून हे काम पुढे नेण्यात येणार आहे.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
वेचक वृत्त
गुरूवार दि.२६ नोव्हेंबर २०२६
THURSDAY, DT.26 NOVEMBER 2026
पान -३
PAGE - 3

आष्टा येथे धर्मनाथ शिंदे व विजय महाद्वार सर या आदर्श प्राथमिक पदवीधर शिक्षकांचा सेवापूर्ती गौरव सोहळा

आ.सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम

आष्टी - (एस.राजेंद्र लाड)

आष्टी तालुक्यातील पीएमश्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, आष्टा (ह.ना.) येथील आदर्श प्राथमिक पदवीधर शिक्षक श्री. धर्मनाथ मालपराव शिंदे व श्री. विजय महादेव महाद्वार हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवाकार्याचा गौरव करण्यासाठी रविवार, दिनांक २९ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता शाळेच्या प्रांगणात भव्य सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. मा. श्री. सुरेश धस (आण्णा), माजी मंत्री तथा विधानसभा सदस्य, आष्टी-पाटोदा-शिरूर हे राहणार आहेत. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी आ. मा. श्री. भीमराव धोंडे साहेब, माजी आ. मा. श्री. साहेबराव दरेकर (नाना), माजी आ. मा. श्री. बाळासाहेब आजबे (काका) तसेच रयत शिक्षण संस्थेचे मा. प्राचार्य गुरुवर्य श्री. ता. भि. हिरवे सर उपस्थित राहणार आहेत.

यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद रत्नागिरी मा. श्री. नागनाथजी शिंदे, गटशिक्षणाधिकारी आष्टी-शिरूर मा. श्री. प्रशांत शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य बीड मा. श्री. देविदास (आबा) धस, महात्मा फुले युवा दल महाराष्ट्राचे अध्यक्ष मा. ड. सतीशजी शिंदे, शिक्षण विस्तार अधिकारी आष्टी मा. श्रीमती सीमा काळे, अधिव्याख्याता विद्या प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर मा. श्री. पांडुरंग चव्हाण, गटशिक्षणाधिकारी जामखेड मा. श्री. धनंजय बोंदार्डे, गटशिक्षणाधिकारी नेवासा मा. श्री. शिवाजी कराड, पंचायत समिती आष्टीचे माजी उपसभापती मा. श्री. अमरराजे निंबाळकर, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी बीड मा. श्री. मनोरंजन धस, शिक्षण विस्तार अधिकारी नाशिक मा. श्रीमती अनिता चव्हाण, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त आदर्श शिक्षक मा. श्री. संदीप पवार, स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्था, कडाचे अध्यक्ष मा. श्री. मारुती पठाडे, उपाध्यक्ष मा. श्री. अशोक लटपटे, सचिव मा. श्री. महेशकुमार शिंदे, तसेच केंद्रप्रमुख मातकुळी मा. श्री. अशोक वामन यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

शिक्षक हा समाजाच्या जडणघडणीतील महत्त्वाचा घटक असून, आपल्या ज्ञानदानाच्या माध्यमातून अनेक पिढ्यांना घडविण्याचे मोलाचे कार्य तो करीत असतो.



शैक्षणिक क्षेत्रात प्रदीर्घ काळ योगदान देणाऱ्या शिक्षकांच्या कार्याचा गौरव करणे ही समाजाची नैतिक जबाबदारी आहे. याच भावनेतून श्री. धर्मनाथ मालपराव शिंदे व श्री. विजय महादेव महाद्वार यांच्या सेवाकार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास आष्टा (ह.ना.) येथील सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, पालक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य, केंद्र मातकुळीचे मुख्याध्यापक व शिक्षकवृंद तसेच पीएमश्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, आष्टा (ह.ना.) येथील मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. सेवानिवृत्त होणाऱ्या दोन्ही शिक्षकांच्या सेवाकार्याचा गौरव करण्यासाठी शिक्षणप्रेमी, नागरिक, पालक व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



अद्ययावत आधार सेवा केंद्राचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

बीड (जिमाका)

बीड शहरातील नागरिकांची आधारसंबंधित कामांसाठी होणारी धावपळ आता थांबणार आहे. भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाच्या मुंबई प्रादेशिक कार्यालयाच्या वतीने बीड शहरात नवीन आणि अद्ययावत आधार सेवा केंद्र सुरू करण्यात आले आहे. विशेष म्हणजे हे केंद्र आठवड्याचे सातही दिवस नागरिकांसाठी खुले राहणार आहे. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते आणि यूआयडीएआय मुंबई कार्यालयाचे प्रकल्प व्यवस्थापक अभिषेक पांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत या केंद्राचे उद्घाटन पार पडले.

यावेळी सेवा पुरवठादार संस्था प्रोटीन ई-गव्हर्नन्स टेक्नॉलॉजीज लिमिटेडचे वरिष्ठ अधिकारी- कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कॅनॉल रोडवरील नगर नाका परिसरातील महालक्ष्मी टॉवर, लाईफलाईन इमारतीच्या पहिल्या मजल्यावर हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. नागरिकांना रांगेत ताटकळत उभे राहू नये, यासाठी यूआयडीएआयच्या ऑनलाईन पोर्टलवरून आगाऊ वेळ आरक्षित करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय भावी पिढीची डिजिटल ओळख सुरक्षित करण्यासाठी शाळांमध्ये विशेष बायोमेट्रिक अद्ययावतीकरण शिबिरेही आयोजित केली जात आहेत.बीड मधील हे आधुनिक आधार सेवा केंद्र नागरिकांसाठी जलद, सोयीस्कर आणि पारदर्शक सेवा सुनिश्चित करेल. डिजिटल इंडियाचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा आहे, असे मत निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी यावेळी व्यक्त केले.

पुढील पाच वर्षांत महाराष्ट्रात पायाभूत सुविधा क्षेत्रात १०० अब्ज डॉलर्स गुंतवणुकीचे उद्दिष्ट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

शहरे ही आर्थिक विकासाची इंजिने, नियोजनबद्ध शहरीकरणावर भर देण्याचे आवाहन

तिसऱ्या जागतिक महापौर परिषदेचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

मुंबई (जिमाका)

शहरीकरण ही समस्या नसून आर्थिक आणि सामाजिक विकासाची मोठी संधी आहे. देशाच्या एकूण जीडीपीमध्ये शहरांचा वाटा सुमारे ६५ टक्के असून, शहरे ही आर्थिक विकासाची इंजिने आहेत. त्यामुळे शहरीकरणाकडे ओझे म्हणून न पाहता विकासाची संधी म्हणून पाहण्याची गरज आहे. त्यासाठी नियोजनबद्ध, शाश्वत आणि नागरिककेंद्रित शहरांची निर्मिती करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पायाभूत सुविधा क्षेत्रात पुढील पाच वर्षांत महाराष्ट्रात १०० अब्ज डॉलरची गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट राज्याने निश्चित केले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

मुंबई येथे आयोजित तिसऱ्या जागतिक महापौर परिषदेचे (वर्ल्ड मेयर्स फोरम) मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी श्री. फडणवीस बोलत होते. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित या परिषदेस केंद्रीय गृहनिर्माण व नगरविकास राज्यमंत्री तोखन साहू, हिमाचल प्रदेशचे सार्वजनिक बांधकाम मंत्री विक्रमादित्य सिंह, पश्चिम बंगालचे राज्यमंत्री उमेश राय, मुंबईच्या महापौर रितू तावडे, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे अध्यक्ष रणजित चव्हाण, महासंचालक जयराज पाठक, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य राजकिशोर मोदी, यांच्यासह देश-विदेशातील महापौर, नगरप्रशासक, लोकप्रतिनिधी आणि शहरी विकास क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, की भारतात पूर्वी शहरीकरणाला समस्या मानून ते रोखण्याचा प्रयत्न झाला. मात्र, शहरीकरण रोखता आले नाही आणि त्याचे योग्य नियोजनही झाले नाही. परिणामी अनियोजित शहरे, झोपडपट्ट्या, अपुऱ्या नागरी सुविधा, पाणीटंचाई आणि कचरा व्यवस्थापनाच्या समस्या निर्माण झाल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०१४ नंतर शहरीकरणाकडे विकासाची संधी म्हणून पाहण्याची भूमिका मांडली. त्यानंतर देशातील शहरी प्रशासन आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला नवी दिशा मिळाली.

मुंबई महानगर प्रदेशात ५० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक..

मुंबई महानगर प्रदेशात गेल्या काही वर्षांत सुमारे ५० अब्ज डॉलरची गुंतवणूक करून मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा विकसित करण्यात येत आहेत. ३०० किलोमीटरपेक्षा अधिक मेट्रो नेटवर्क, रस्ते, उड्डाणपूल, बोगदे, पाणीपुरवठा, सांडपाणी प्रक्रिया आणि घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रकल्पांवर भर दिला जात आहे. शाश्वतता, सक्षम वाहतूक व्यवस्था आणि नागरिकांसाठी राहण्यायोग्य शहरे हे शहरी विकासाचे तीन महत्वाचे आधारस्तंभ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तिसरी, चौथी मुंबई आकाराला येणार.?

महाराष्ट्राच्या भविष्यातील शहरी विकासाचे चित्र मांडताना मुख्यमंत्र्यांनी तिसऱ्या आणि चौथ्या मुंबईच्या निर्मितीचा उल्लेख केला. नवी मुंबई विमानतळ परिसरात तिसरी मुंबई विकसित करण्यात येत असून, या 'तिसऱ्या मुंबई'मध्ये एज्यु-सिटी, स्पोर्ट्स सिटी, मेडि-सिटी, इनोव्हेशन सिटी आणि ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर सिटी विकसित करण्यात येत आहे. येथे शिक्षण, क्रीडा, वैद्यकीय सेवा, नवोपक्रम आणि जागतिक कंपन्यांच्या ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्ससाठी स्वतंत्र परिसंस्था उभारण्यात येणार आहे. सुमारे एक लाख विद्यार्थ्यांची क्षमता असलेली शैक्षणिक व्यवस्था आणि १२ जागतिक दर्जाच्या विद्यापीठांचे कॅम्पस उभारण्याचे नियोजन आहे. त्यापैकी सात विद्यापीठांनी कामकाज सुरू केल्याचेही त्यांनी सांगितले.

विरार ते वाढवण परिसरात चौथी मुंबई विकसित करण्यात येत आहे. वाढवण येथे देशातील सर्वात मोठ्या बंदरापैकी एक बंदर उभारले जात असून, ते जगातील दहा मोठ्या बंदरांमध्ये स्थान मिळवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बुलेट ट्रेन आणि सुपर एक्स्प्रेस वेच्या माध्यमातून या परिसराला मुंबईशी जोडण्यात येणार आहे. पुढील पाच वर्षांत महाराष्ट्रात १०० अब्ज डॉलरची गुंतवणूक पायाभूत सुविधांमध्ये करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी सांगितले.अटल सेतूमुळे मुंबई आणि नवी मुंबई विमानतळ परिसरातील प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. २२ किलोमीटर लांबीच्या या सागरी सेतूमुळे नवी मुंबई विमानतळापर्यंत सुमारे ४० मिनिटांत पोहोचता येते. पुढील वर्षी हा प्रवास ३० मिनिटांत पूर्ण करता येईल. एकीकडे विद्यमान शहरांचे पुनरुज्जीवन आणि पुनर्विकास, तर दुसरीकडे नव्या शहरांची निर्मिती अशा दुहेरी धोरणातून राज्य नागरी विकासाला गती देत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या शहरांमध्ये मोठे परिवर्तन होत असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

गुंतवणुकीपेक्षा इच्छाशक्ती आणि नियोजन महत्त्वाचे..

मुख्यमंत्री म्हणाले की, देशाच्या सकल देशांतर्गत उत्पन्नात शहरांचा वाटा ६५ टक्के आहे. महाराष्ट्राची ५० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या सुमारे ४०० शहरांमध्ये, तर उर्वरित लोकसंख्या सुमारे ४० हजार गावांमध्ये राहते. त्यामुळे शहरांमध्ये उत्तम राहणीमान निर्माण करून राज्यातील निम्म्या लोकसंख्येच्या जीवनमानात सुधारणा करण्याची मोठी संधी आहे.

शहरांच्या विकासासाठी केवळ मोठ्या आर्थिक गुंतवणुकीची आवश्यकता नसते, तर त्यासाठी इच्छाशक्ती, ठाम निर्धार आणि योग्य नियोजन महत्वाचे असते. जागतिक स्तरावर गुंतवणुकीसाठी भांडवल उपलब्ध आहे. मात्र, त्यासाठी व्यवहार्य आणि दर्जेदार प्रकल्प तयार ठेवणे आवश्यक आहे. प्रकल्पांचे योग्य नियोजन केल्यास गुंतवणूक आपोआप आकर्षित होते, असे फडणवीस यांनी नमूद केले.

धारावीचे रूपांतर नव्या व्यावसायिक केंद्रात..

मुंबईतील जुन्या वस्त्या आणि इमारतींचे पुनरुज्जीवन, पुनर्विकास आणि नागरी परिवर्तन सुरू आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या माध्यमातून तेथील रहिवाशांना सर्व सुविधांनी युक्त सन्मानजनक घरे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सध्या मुंबईचे प्रमुख व्यावसायिक केंद्र असलेले बीकेसी भविष्यात धारावीच्या रूपाने आणखी एका महत्वाच्या व्यावसायिक केंद्राला जोडले जाईल. पुढील दहा वर्षांत धारावी हे मुंबईचे नवे व्यावसायिक केंद्र म्हणून विकसित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महापौर हे नागरिकांचे पहिले उत्तरदायी प्रतिनिधी..

आपण स्वतः नागपूरचे महापौर म्हणून काम केले असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजातील आव्हानांची जाणीव असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. नागरिकांना रस्ते, पाणी, स्वच्छता किंवा अन्य नागरी सुविधांबाबत समस्या निर्माण झाल्यास ते सर्वप्रथम महापौर किंवा नगरसेवकांकडे अपेक्षेने पाहतात. त्यामुळे महापौरांचे काम अत्यंत आव्हानात्मक असून त्यांना चोवीस तास सज्ज राहावे लागते, असे ते म्हणाले.प्रत्येक शहराने दुसऱ्या शहरातील यशस्वी प्रयोगांचा अभ्यास करून त्यांची अंमलबजावणी करावी. इंदूर, अहमदाबाद आणि मुंबई यांसारख्या शहरांतील चांगल्या कार्यपद्धतींचा इतर शहरांना उपयोग होऊ शकतो. प्रत्येक वेळी नव्याने प्रयोग करण्याऐवजी यशस्वी मॉडेलचा स्वीकार करावा, असे आवाहन त्यांनी केले.

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने शंभर वर्षांत शहरी प्रशासन, प्रशिक्षण, लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांची क्षमता बांधणी आणि धोरणनिर्मितीमध्ये दिलेल्या योगदानाचे त्यांनी कौतुक केले. जागतिक महापौर परिषदेत होणाऱ्या चर्चांमधून आणि निष्कर्षांमधून मिळणाऱ्या सूचना महाराष्ट्र शासनाला सादर कराव्यात. त्यावर सकारात्मक विचार करून आवश्यक अंमलबजावणी करण्यात येईल, अशी ग्वाहीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

यावेळी देशभरातील यशस्वी नागरी उपक्रम आणि उत्तम कार्यपद्धतींचे संकलन असलेल्या ग्रंथाचे प्रकाशन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. केंद्रीय गृहनिर्माण व नगरविकास राज्यमंत्री तोखन साहू व महापौर रितू तावडे यांनी मनोगत व्यक्त केले. श्री. पाठक यांनी प्रस्ताविकात परिषदेच्या आयोजनाची भूमिका व संस्थेच्या कार्याची माहिती दिली.



बीड जिल्ह्याची ओळख सिल्क बीड म्हणून निर्माण होईल जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड (जिमाका)

रेशीम उत्पादनाला वस्त्रोद्योगाची जोड देऊन जिल्ह्यातच आकर्षक सिल्क साड्यांची निर्मिती केली जाईल आणि आगामी ९ ते १० वर्षांत राज्याच्या नकाशावर जिल्ह्याची ओळख सिल्क बीड म्हणून निर्माण होईल, असा विश्वास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी व्यक्त केला.

जिल्हा रेशीम कार्यालयाच्या वतीने केंद्र शासनाच्या सिल्क समग्र-२ योजनेंतर्गत आयोजित निवासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन बुधवार दि. २५ नोव्हेंबर रोजी वेदभवन येथे जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांच्या हस्ते झाले.जालना जिल्ह्याच्या धर्तीवर बीड जिल्ह्यातही वस्त्रोद्योग प्रकल्प उभारण्यात यावा आणि या माध्यमातून जिल्ह्यातच रेशीम धाग्यापासून आकर्षक सिल्क साड्यांची निर्मिती व्हावी, अशी महत्त्वाकांक्षी संकल्पना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आपल्या भाषणातून मांडली. तसेच जिल्ह्यातील पोखरा योजनेंतर्गत २०० हून अधिक गावांचा समावेश असून, या गावांमध्ये रेशीम उत्पादन, तुती लागवड आणि फळबाग लागवडीला प्रोत्साहन दिले जात आहे. रेशीम उत्पादनापासून ते सिल्क साडी निर्मितीपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया जिल्ह्यात विकसित झाल्यास स्थानिक स्तरावर मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होऊ शकते. विशेषतः महिलांना शिवणकाम, वस्त्रनिर्मिती आणि वस्त्रोद्योग क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. त्यामुळे रेशीम उत्पादनाला उद्योगाची जोड देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणे शक्य होणार आहे. यासोबतच जिल्ह्यातील शेतीचा शाश्वत विकास साधण्यासाठी जलसंधारण आणि जलव्यवस्थापनावर विशेष भर देण्याची आवश्यकताही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे यांनी व्हीबी-जी-राम-जी योजनेतून रेशीम शेतीला बळ देण्याची ग्वाही दिली, तर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी बांधावर जाऊन अडचणी सोडवण्याचे आश्वासन दिले. प्रास्ताविकात रेशीम विकास अधिकारी शंकर वराट यांनी दुष्काळी परिस्थितीत तुती संगोपनाचे तंत्रज्ञान, पाच दिवसीय तांत्रिक प्रशिक्षण आणि ३० नोव्हेंबर ते १ डिसेंबर दरम्यान गडहिंग्लज जि. कोल्हापूर येथील अंडीपुंज केंद्रावर होणाऱ्या दोन दिवसीय अभ्यास दौऱ्याची माहिती दिली.

माणुसकीचा सुगंध जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात दरवळला.!

कै. बापुराव नारायण घुंगरड यांच्या पुण्यस्मरणानिमित्त अनाथ, बेघर आणि ज्येष्ठांना अन्नदान

बीड ।प्रतिनिधी

माणसाचे आयुष्य किती मोठे आहे, यापेक्षा त्याच्या हातून किती माणुसकीची कामे घडतात, याला अधिक महत्त्व असते. दिवंगत व्यक्तीच्या स्मृती जपण्याचे अनेक मार्ग असतात मात्र गरजूंच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलवून त्यांच्या स्मृतींना उजाळा देणे, ही खऱ्या अर्थाने आदरांजली ठरते. असाच माणुसकीचा प्रेरणादायी उपक्रम बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात घुंगरड - परिवाराच्या वतीने पार पडला.

दि. २४ नोव्हेंबर २०२६ रोजी कै. बापुराव नारायण घुंगरड यांच्या १९ व्या पुण्यस्मरणानिमित्त घुंगरड कुटुंबीयांच्या वतीने जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील अनाथ, निराधार, बेघर आणि वयोवृद्ध आजी-आजोबांसाठी अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून समाजातील उपेक्षित आणि गरजू घटकांना प्रेमाने भोजन देत दिवंगत कै. बापुराव घुंगरड यांच्या स्मृतींना आगळ्यावेगळ्या पद्धतीने अभिवादन



करण्यात आले.

आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थकेंद्री जीवनशैलीत स्वतःच्या कुटुंबापुरते मर्यादित न राहता समाजातील निराधार व्यक्तींच्या भुकेची जाणीव ठेवणे, हे निश्चितच कौतुकास्पद आहे. एखाद्या पुण्यतिथीनिमित्त मोठे खर्चिक कार्यक्रम करण्याऐवजी गरजूंना अन्नदान करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा घुंगरड कुटुंबीयांचा हा उपक्रम समाजाला माणुसकीचा सुंदर संदेश देणारा ठरला. या प्रसंगी डॉ. शिवाजी बापुराव घुंगरड, सुरेंद्र बापुराव घुंगरड, सौ. मंगल भारत येडे आणि सौ. जयश्री सुनील थीटे यांची उपस्थिती होती.जिव्हाळा बेघर निवारा परिवाराच्या वतीने घुंगरड कुटुंबीयांचे मनःपूर्वक आभार संचालक अभिजीत वैद्य, मुख्य व्यवस्थापक राजू वंजारे, काळजीवाहक छाया सरोदे सह परिवाराच्यावतीने व्यक्त करण्यात आले.समाजातील प्रत्येक सक्षम कुटुंबाने आपल्या आनंदाच्या, वाढदिवसाच्या अथवा स्मृतिदिनाच्या निमित्ताने अनाथ, निराधार, बेघर आणि वयोवृद्ध व्यक्तींच्या मदतीसाठी पुढाकार घेतला, तर अनेक उपेक्षितांच्या आयुष्यात आनंदाचा घास पोहोचू शकतो. कारण अन्नदान हे केवळ दान नसून भुकेल्या माणसाच्या वेदनेशी जोडलेले माणुसकीचे नाते आहे.

निवृत्तीवेतन धारकासाठी आयोजित विशेष शिबिरास मुदतवाढ

बीड (जिमाका)

केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार दि.१ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत डिजिटल हयातीचा दाखला सादर करण्यासाठी मुदतवाढीसह विशेष अभियान राबविण्यात येत आहे. तरी जिल्ह्यातील सर्व निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांनी जिल्हा कोषागार कार्यालयातील या शिबिरात उपस्थित राहून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी महेश बाब्रस यांनी केले आहे.

जिल्ह्यातील निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांसाठी दि.१८ ते २० नोव्हेंबर या कालावधीत जिल्हा कोषागार कार्यालय बीड येथे विशेष शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ऑनलाइन हयात प्रमाणपत्र तयार करणेबाबत माहिती व जीवन प्रमाण पद्धारे जीवन प्रमाणपत्र तयार करुन देण्यात आले आहेत.

शिबीरास निवृत्तीवेतनधारकांचा प्रतिसाद पाहता सदर शिबीरास दि. ३० नोंव्हेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

महात्मा फुलेंच्या अर्थनीतीवर आज शासकीय विभागीय ग्रंथालयात व्याख्यान

छत्रपती संभाजीनगर (जिमाका)

महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्त तसेच संविधान दिनाचे औचित्य साधून शासकीय विभागीय ग्रंथालय, सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालय आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील समर्थनगर येथील शासकीय विभागीय ग्रंथालयात सकाळी ११ वाजता 'महात्मा फुलेंची अर्थनीती - श्रमाला प्रतिष्ठा, शिक्षणाला संपत्ती' या विषयावर हे व्याख्यान होणार आहे. उद्योजक अभियंता तथा अर्थविषयक अभ्यासक डॉ. डी. एस. काटे हे व्याख्यानातून महात्मा फुले यांच्या आर्थिक विचारांचा आणि श्रम व शिक्षणविषयक दृष्टिकोनाचा उहापोह करणार आहेत.



भीमरावदादा माळशिखरे यांना 'राष्ट्रीय समाजरत्न नागरी पुरस्कार २०२६' प्रदान

आष्टी - (एस.राजेंद्र लाड)

आष्टी तालुक्यातील वाहिरा व घोंगडेवाडी परिसरातील सहकार, कृषी, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणारे प्रगतिशील शेतकरी व फळबागायतदार भीमरावदादा रंगनाथ माळशिखरे यांना महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषद, महाराष्ट्र यांच्या वतीने प्रतिष्ठेचा 'राष्ट्रीय समाजरत्न नागरी पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले आहे. पंढरपूर (जि. सोलापूर) येथील श्रीराम मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात परिषदेचे प्रदेशाध्यक्ष व्यंकटराव जाधव, प्रदेश सचिव प्राचार्य गोपीनाथ सगर, प्रदेश कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील, प्रदेश कोषाध्यक्ष व्यंकटराव वडजे आदी मान्यवरांच्या हस्ते त्यांना पुरस्कार व मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. भीमरावदादा माळशिखरे यांनी सार्वजनिक आणि सहकार क्षेत्रात प्रदीर्घ काळ उल्लेखनीय कार्य केले आहे. वाहिरा घोंगडेवाडी ग्रामपंचायतीचे तब्बल २५ वर्षे सरपंचपद भूषविताना त्यांनी गावाच्या विकासासाठी योगदान दिले. तसेच वाहिरा सेवा सहकारी संस्थेचे २० वर्षे चेअरमन म्हणून काम पाहिले. कडा कृषी उत्पन्न बाजार समिती, शेतकरी सहकारी सूतगिरणी आणि आष्टी तालुका देखरेख सहकारी संघ या संस्थांमध्ये प्रत्येकी पाच वर्षे संचालक म्हणून त्यांनी जबाबदारी पार पाडली. याशिवाय महेश सहकारी साखर कारखान्याचे तब्बल १० वर्षे संचालक म्हणून काम करत सहकार क्षेत्रातील आपला अनुभव आणि कार्यकुशलता सिद्ध केली आहे. समाजकार्य, लोकसेवा आणि सामाजिक बांधिलकी जपत अनेकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडविण्यासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिक्षण, शिस्त, संस्कार, विद्वत्ता, कर्तव्यनिष्ठा आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुरेख संगम साधत केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता जीवन जगण्याची कला शिकविणारे व्यक्तिमत्त्व म्हणून मानपत्रातून त्यांचा गौरव करण्यात आला आहे. राष्ट्र उभारणीच्या कार्यात त्यांचे योगदान मोलाचे असल्याचेही मानपत्रात नमूद करण्यात आले आहे. भीमरावदादा माळशिखरे हे सहकार आणि सामाजिक क्षेत्राबरोबरच प्रगतिशील व प्रयोगशील शेतकरी म्हणूनही परिचित आहेत. त्यांच्या शेतामध्ये द्राक्ष, डाळिंब, संत्री, पेरू आदी विविध फळपिकांच्या बागा असून आधुनिक शेती पद्धती आणि नवनवीन प्रयोगांच्या माध्यमातून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. परिसरातील अनेक शेतकरी त्यांच्या शेतीला भेट देऊन मार्गदर्शन व माहिती घेतात आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन फळबाग शेतीकडे वळत आहेत. सामाजिक, राजकीय, धार्मिक, सहकार आणि कृषी अशा विविध क्षेत्रांत त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. त्यांच्या या राष्ट्रीय सन्मानामुळे वाहिरा, घोंगडेवाडी, कडा तसेच आष्टी परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पुरस्काराबद्दल माजी सभापती साहेबराव म्हस्के, पांडुरंग गावडे, बन्सीभाऊ पोकळे, बाळासाहेब शिंदे, अहमद पठाण, यशवंत खंडागळे, बाबासाहेब गर्जे, बाबासाहेब कर्डिले, उत्तम बोडखे, अण्णासाहेब लांबडे आदी मान्यवरांनी त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)

विविध वृत्त

गुरूवार दि.२६ नोव्हेंबर २०२६
THURSDAY, DT.26 NOVEMBER 2026

पान -४
PAGE - 4

महाराष्ट्राच्या राजकारणात २०२९ चा नवा राजकीय भूकंप?

तटकरे-पटेलांसह राष्ट्रवादीचे २२ आमदार भाजपच्या तिकिटावर लढणार

शिंदेंच्या शिवसेनेतील आमदारही भाजपच्या संपर्कात असल्याचा रोहित पवारांचा खळबळजनक दावा.!

मुंबई ।प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणात आगामी २०२९ च्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आतापासूनच राजकीय समीकरणांची जुळवाजुळव सुरू झाल्याचे संकेत मिळत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत घडामोडी आणि महायुतीतील घटक पक्षांच्या भवितव्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केलेल्या एका खळबळजनक दाव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांच्यासह अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस गटातील २२ आमदार आगामी २०२९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवतील, असा दावा रोहित पवार यांनी केला आहे. एवढेच नव्हे तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील काही आमदारही भाजपच्या संपर्कात असून ते आगामी निवडणुकीत भाजपच्या चिन्हावर मैदानात उतरू शकतात, असेही त्यांनी म्हटले आहे.

महायुतीतील मित्रपक्षांचे अस्तित्व धोक्यात.?

रोहित पवार यांच्या या दाव्यामुळे महायुतीतील भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना या तीन पक्षांच्या भविष्यातील राजकीय वाटचालीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. भाजपला राज्यात स्वतःचे राजकीय बळ वाढवायचे असल्यास मित्रपक्षांतील प्रभावशाली नेत्यांना आपल्या पक्षात सामावून घेण्याची रणनीती आखली जात आहे का, अशी चर्चा सुरू झाली आहे.

राष्ट्रवादीतील २२ आमदार आणि शिंदे गटातील काही आमदार भाजपच्या तिकिटावर लढले, तर मित्रपक्षांच्या राजकीय अस्तित्वाचे काय होणार.? त्यांच्या पक्षसंघटनांचे भवितव्य काय राहणार ? तसेच सध्याच्या सत्तावाटपाची समीकरणे २०२९ पर्यंत बदलणार का, असे अनेक प्रश्न या दाव्यामुळे पुढे आले आहेत.

तटकरे आणि शेळकेंकडून दाव्याला विरोध.!

रोहित पवार यांच्या विधानावर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी तीव्र प्रतिक्रिया देत रोहित पवार यांचे आरोप फेटाळले होते. राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचा



घटक असून पक्ष संघटना मजबूत करण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते.तर मावळचे आमदार सुनील शेळके यांनीही रोहित पवार यांच्या विधानावर नाराजी व्यक्त करत त्यांच्यावर पलटवार केला होता. त्यामुळे हा दावा राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या भोवऱ्यात सापडला आहे.

२०२९ ची निवडणूक ठरवणार राजकीय पक्षांचे भवितव्य.!

महाराष्ट्रात यापूर्वी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटीमुळे राज्याचे राजकारण पूर्णपणे बदलले. आता पुन्हा मित्रपक्षांतील संभाव्य राजकीय हालचालींची चर्चा सुरू झाली आहे. मात्र रोहित पवार यांनी केलेला दावा अद्याप राजकीय आरोप आणि अंदाजाच्या स्वरूपातच आहे. संबंधित आमदार भाजपमध्ये प्रवेश करणार किंवा भाजपच्या तिकिटावरच निवडणूक लढवणार, याची अधिकृत पुष्टी झालेली नाही.राजकारणात सत्तेसाठी युती होते, सत्तेसाठी पक्षांतर होते; मात्र मित्रपक्षांनाच भविष्यातील राजकीय स्पर्धक बनवण्याची रणनीती आखली जात असेल, तर महायुतीतील अंतर्गत विश्वासाचे काय ? हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शालेय प्रवेश दिनानिमित्त शिक्षकांसाठी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे - मुख्य संयोजक प्रा. प्रदीप रोडे

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक शाळा प्रवेश दिनाला १२६ वर्षे पूर्ण होत असल्याच्या औचित्याने नालंदा फाऊंडेशन, बीडच्या वतीने महाराष्ट्र राज्यातील शिक्षकांसाठी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन नालंदा फाउंडेशन च्या वतीने २५ डिसेंबर २०२६ रोजी बीडमध्ये करण्यात आले आहे. या स्पर्धेत अधिकाधिक शिक्षकांनी सहभागी व्हावे असे आवाहन नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे यांनी केले आहे.



तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, आदर्श नगर, डी.पी. रोड, बीड येथे या स्पर्धेचे आयोजन २५ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी नऊ वाजता करण्यात आले आहे.या स्पर्धेसाठी तीन विषय निश्चित करण्यात आले आहेत. यामध्ये १) कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील शिक्षक : नव्या संधी, नवी आव्हाने' २) 'महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा गुरु-शिष्य कार्यात्मक अनुबंध आणि ३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राज्यघटना निर्मितीत योगदान या विषयांचा समावेश आहे.सहभागी शिक्षकांना या तीन विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर ७ ते १० मिनिटांच्या कालावधीत आपले वक्तृत्व सादर करावे लागणार आहे. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास १५ हजार रुपये, तर तृतीय क्रमांकास १० हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. याशिवाय विजेत्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क ५०० रुपये निश्चित करण्यात आले असून, दि. १ नोव्हेंबर ते २२ डिसेंबर २०२६ या कालावधीत नावनोंदणी करता येणार आहे. विशेष म्हणजे, स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व शिक्षकांसाठी आयोजकांच्या वतीने एक वेळ मोफत भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी, पदव्युत्तर तसेच विद्यापीठस्तरावरील शिक्षकांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपली नावनोंदणी करावी, असे आवाहन मुख्य संयोजक तथा नालंदा फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे यांनी केले आहे. स्पर्धेच्या नावनोंदणीसाठी व सविस्तर माहितीसाठी ७९९०७६०१५१ आणि ९५६१८१७४७४ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हरित अभियानाचा पुरस्कार स्वीकारणारे जिल्हा प्रशासन शासकीय कार्यालयांतील वृक्षतोडीवर गप्प का ?

बीड : हरित महाराष्ट्राच्या धर्तीवर बीड जिल्हा प्रशासनाने ७ ऑगस्ट २०२५ रोजी एकाच दिवसात ३० लाख वृक्षलागवडीचा विक्रम नोंदविला. या विक्रमाची 'इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये नोंद झाल्यानंतर तत्कालीन पालकमंत्री लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या हस्ते जिल्हाधिकारी यांनी पुरस्कार स्वीकारला. मात्र, दुसरीकडे बीड शहरातील जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा कारागृह, पाटबंधारे विभाग आणि जिल्हा रुग्णालय परिसरात कथित विनापरवानगी वृक्षतोड सुरू असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे वृक्षलागवडीचा विक्रम आणि प्रत्यक्षात होत असलेली वृक्षतोड यातील विरोधाभास उघड झाला आहे.

या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचारप्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य, डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हा प्रशासन व वनविभागाकडे वेळोवेळी लेखी निवेदने देऊन तसेच आंदोलन करून दोषींवर कारवाईची मागणी केली. मात्र, अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

वनविभागाचे अधिकारी केवळ 'आम्ही वृक्षतोडीस परवानगी दिलेली नाही' असे सांगून जबाबदारी झटकत आहेत. मग विनापरवानगी वृक्षतोड करणाऱ्यांवर कारवाई करण्याची जबाबदारी कोणाची? हरित अभियानांतर्गत पुरस्कार स्वीकारणारे जिल्हा प्रशासन आणि वनविभाग शासकीय कार्यालयांतील वृक्षतोडीबाबत धृतराष्ट्राची भूमिका का घेत आहेत, असा संतप्त सवाल डॉ. ढवळे यांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणी मुख्यमंत्री, वनमंत्री व पालकमंत्री यांच्याकडे तक्रार करण्यात आली असून आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

जिल्हा रुग्णालय परिसरातील ५९ वृक्षांची कत्तल; दोषींवर कारवाई करा!

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते बार्शी नाका दरम्यान सुरू असलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या कामाच्या नावाखाली जिल्हा रुग्णालयाच्या संरक्षक भिंतीच्या आतील तब्बल ५९ झाडे अर्धवट तोडण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके यांनी याबाबत आपल्याला कोणतीही पूर्वकल्पना देण्यात आली नसल्याचे सांगितले आहे. संबंधित महामार्ग व इतर विभागांना पत्र देऊन जिल्हाधिकाऱ्यांनाही याबाबत कळविणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तोडण्यात आलेल्या ५९ वृक्षांमध्ये २१ शिसम, ९ लिंब, ७ शेवरी, ५ निलगिरी, ५ जंगली, ३ नारळ, ३ शोभेची झाडे, २ गुलमोहर, २ पिंपळ, १ अशोक आणि १ जांभूळ या वृक्षांचा समावेश आहे. रुग्णालय परिसरातील या वृक्षतोडीची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी, कंत्राटदार व जबाबदार व्यक्तींवर कारवाई करावी, अशी मागणी डॉ. ढवळे यांनी केली आहे.

शासकीय कार्यालयांतील वृक्षतोडीला प्रशासनाचे अभय?

बीड शहरातील जिल्हाधिकारी कार्यालय, पाटबंधारे विभाग, जिल्हा कारागृह आदी शासकीय कार्यालयांतील विनापरवाना वृक्षतोडीबाबत लेखी तक्रारी व आंदोलने करूनही जिल्हा प्रशासनाकडून ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे वृक्षतोड करणाऱ्यांचे मनोधैर्य वाढले असून, दोन दिवसांपूर्वी जिल्हा रुग्णालय परिसरातही मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्यात आल्याचा आरोप आहे.

एकीकडे लाखो वृक्षलागवडीचा विक्रम आणि पुरस्कारांचा गाजावाजा करायचा, तर दुसरीकडे शासकीय कार्यालयांतील वृक्षतोडीकडे दुर्लक्ष करायचे,

तृतीयपंथीयांच्या सन्मानासाठी आश्रय सेवा केंद्राचा पुढाकार!

हक्काचे घर, स्वतंत्र स्मशानभूमी आणि रोजगाराच्या संधींसाठी प्रशासनाकडे पत्रकार शेख आयेशा यांच्यासह तृतीयपंथीयांचे निवेदन

बीड जिल्ह्यातील एक हजारांहून अधिक तृतीयपंथीयांच्या मूलभूत हक्कांचा प्रश्न ऐरणीवर

बीड ।प्रतिनिधी

समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार असताना तृतीयपंथीय समाजाला आजही निवारा, रोजगार, आरोग्य सुविधा आणि अंत्यसंस्कारासाठी संघर्ष करावा लागत आहे. या समाजाच्या मूलभूत हक्कांना न्याय मिळावा, यासाठी आश्रय सेवा केंद्र बीडच्या वतीने पुढाकार घेण्यात आला असून हक्काचे घर बांधण्यासाठी शासकीय जागा आणि अंत्यसंस्कारासाठी स्वतंत्र स्मशानभूमी उपलब्ध करून देण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा पत्रकार शेख आयेशा यांनी २५ नोव्हेंबर रोजी हे निवेदन असंख्य तृतीय पंथीयांसमवेत जिल्हाधिकारी बीडचे तहसीलदार आणि बीड नगर परिषद् यांच्याकडे सादर केले.

तृतीयपंथीयांसाठी बीडमध्ये स्वतंत्र स्मशानभूमी साठी जागा आणि राहण्यासाठी शासनाने घरकुल द्यावेत विशेष बाब म्हणून घरासाठी शासकीय विनामूल्य जागा उपलब्ध करून द्यावी यासह विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब, बीडचे तहसीलदार, नायब तहसीलदार सुहास हजारे, बीड नगरपरिषद प्रशासकीय अधिकारी आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते खुर्शीद आलम यांच्याकडे पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा तथा पत्रकार शेख आयेशा यांच्यासह सर्वश्री तृतीयपंथीय सपना धुताडमल, गौरी शिंदे, सलोनी कदम, जोया शेख, राजया गायकवाड, नेहा म्हात्रे, शेख अलिष, रोशनी धुताडमल, मुस्कान अत्तार,सय्यद समीरा, शेख मलाईका, छाया कोकणे, शितल साठे, अमृता, नवले प्रज्ञा, आलिया सय्यद, शेख मुस्कान, मयुरी कांबळे, सानिया शेख, रावी अंकुटे, साई सुधार, नंदाबाई, करीनाबाई आदींसह तृतीयपंथीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.





या संवेदनशील मागणीला न्याय देण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणे करेल - गटनेते खुर्शीद आलम

बीड नगरपालिकेच्या हद्दीमध्ये तृतीयपंथीयांना स्मशानभूमीसाठी कुठे जागा उपलब्ध करून देता येईल का ? यासाठी नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या सभागृहात प्रश्न मांडेल. आणि नगरपरिषदेला त्यांना जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करेल असा शब्द बीड नगरपालिकेतील शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते नगरसेवक खुर्शीद आलम यांनी तृतीयपंथीयांच्या शिष्टमंडळाला दिला. तसेच बीड नगरपालिकेच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी देखील तृतीयपंथीयांची मागणी रास्त असून यावर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी प्रशासन प्रयत्न करेल असा शब्द दिला.

बीड जिल्ह्यामध्ये तृतीयपंथीयांची संख्या जवळपास एक हजारांपेक्षा अधिक असून बीड शहरासह माजलगाव, गेवराई, आष्टी, केज, परळी आणि अंबाजोगाई या तालुक्यांमध्ये हा समाज वास्तव्यास आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा, सन्मानाने जगण्याचा आणि निवाऱ्याचा अधिकार दिलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या नालसा निवाडा २०१४ नुसार तृतीयपंथीयांना तृतीय लिंग म्हणून मान्यता देण्यात आली आहे. तसेच तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम २०१९ नुसार त्यांना शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि निवारा या सुविधा मिळणे हा त्यांचा कायदेशीर हक्क आहे.मात्र प्रत्यक्षात या समाजाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. राहण्यासाठी कायमस्वरूपी घर नसल्याने भाड्याच्या घरात राहावे लागते. अनेक ठिकाणी घरमालकांकडून अपमानास्पद वागणूक दिली जाते. नोकरी, मजुरी, दुकानातील काम किंवा इतर रोजगाराच्या संधी सहज उपलब्ध होत नसल्याने उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. समाजाकडून टोमणे, शिवीगाळ, मारहाण, लैंगिक शोषण आणि मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याची व्यथा निवेदनात मांडण्यात आली आहे.

मृत्यूनंतरही सन्मानासाठी संघर्ष.!

तृतीयपंथीय व्यक्तीचे निधन झाल्यानंतर सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यास विरोध केला जातो. अंत्यसंस्कारासाठी जागा मिळत नसल्याने मृतदेहावर सन्मानाने अंतिम संस्कार करणेही कठीण होते. प्रत्येक व्यक्तीला जीवनाच्या शेवटच्या प्रवासात सन्मान मिळाला पाहिजे, अशी भावना निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

या आहेत प्रमुख मागण्या,

१)बीड शहर व जिल्ह्यातील तृतीयपंथीयांना हक्काचे घर बांधण्यासाठी शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करून द्यावी.

२) प्रधानमंत्री आवास योजना, शबरी आवास व रमाई आवास यांसारख्या घरकुल योजनांमध्ये तृतीयपंथीय समाजाचा विशेष प्राधान्याने समावेश करावा.

३) तृतीयपंथीयांच्या अंत्यसंस्कारासाठी स्वतंत्र स्मशानभूमीकरिता शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करून द्यावी.

४) कौशल्य विकास, रोजगार प्रशिक्षण, स्वयंरोजगार आणि शासकीय योजनांची माहिती मिळण्यासाठी स्वतंत्र केंद्र किंवा भवन उभारावे.

५) तृतीयपंथीय समाजावरील अन्याय रोखण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष समिती व तक्रार निवारण कक्ष स्थापन करावा.

या मागण्यांवर जिल्हा प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेऊन तृतीयपंथीय समाजाला न्याय व सन्मान मिळवून द्यावा, अशी अपेक्षा आश्रय सेवा केंद्राच्या वतीने व्यक्त करण्यात आली. बीडचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सर्व तृतीयपंथीयांना लवकरच आपल्याला मूलभूत हक्क मिळाले पाहिजेत यासाठी प्रशासनाची एक विशेष बैठक घेऊन आपल्या मागण्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करेल असे आश्वासित केले.

स्मशानभूमीसाठी प्रशासन गांभीर्याने विचार करेल - नायब तहसीलदार सुहास हजारे

तृतीयपंथीयांच्या अंत्यविधीसाठी बीडमध्ये स्वतंत्र स्मशानभूमी नाही. त्यामुळे त्यांना त्यांचा अंत्यविधी करण्यासाठी बीड वरून प्रेत जर अंबाजोगाईला घेऊन जावे लागत असेल तर ते वेदनादायक आहे. आपल्या भावना लक्षात घेऊन यावर प्रशासनाच्या वतीने लवकरात लवकर मार्ग काढून बीडमध्ये तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र स्मशानभूमी साठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी वरिष्ठांकडे पाठपुरावा केला जाईल. त्यासोबतच ज्या तृतीय पंथियांकडे स्वतःच्या जागेचा पीटीआर असेल त्यांना घरकुल तसेच ज्यांच्याकडे राशन कार्ड नसेल, ज्यांना आधार कार्ड नसेल त्यांना ते तात्काळ देण्याबाबत देखील प्रशासन तत्परतेने काम करेल असे नायब तहसीलदार सुहास हजारे यांनी आश्वासित केले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 (MAHARSHTRA).

पेज नंबर २ वर वाचा..

वैचारिक अग्रलेख...

मोफत धान्याचा निर्णय स्वागतार्ह मात्र प्रश्नांवर कायमस्वरूपी उपाय कधी.?

दैनिक

समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकारांचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ७ वे अंक – ७६ गुरुवार दि.२६ नोव्हेंबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-7th Issue-76 Thursday, Dt.26 November 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

'गुरुराज माऊली'च्या जयघोषाने कपिलधार दुमदुमले..!

मन्मथ माऊलींच्या संजीवन समाधीची शासकीय महापूजा भक्तिमय वातावरणात संपन्न

राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराजांच्या ७२ व्या महापदयात्रेची ऐतिहासिक परंपरा कायम,महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणातील लाखो भाविकांची उपस्थिती

कपिलधार (जि. बीड) प्रतिनिधी :

श्रद्धा, भक्ती, अध्यात्म आणि सामाजिक एकात्मतेचा अनोखा संगम असलेल्या श्रीक्षेत्र कपिलधार येथे मन्मथ माऊली यांच्या संजीवन समाधीची शासकीय महापूजा अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. 'गुरुराज माऊली... गुरुराज माऊली...'च्या अखंड जयघोषाने कपिलधारचा परिसर दुमदुमून गेला. महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांतील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या यात्रेने पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या समृद्ध संतपरंपरेचे दर्शन घडविले.

यावेळी राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांचे उत्तराधिकारी राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज, शंकरलिंग शिवाचार्य महाराज शिरूर अनंतपाळकर, बालानंद महाराज, संगणबसव महास्वामी निलंगेकर, आचार्य गुरुराज महाराज, विधान परिषदेचे आमदार बसवराज पाटील मुरूमकर, शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस शिवानंद हेंगणे, संजीवनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे, पंचायत समिती सदस्य गजानन होनराव, कपिलधार महापदयात्रा समितीचे अध्यक्ष मन्मथ पालापुरे, देवस्थानचे विश्वस्त आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

७२ वर्षांची अखंड परंपरा, संतविचारांचा चालता–बोलता जागर.!

राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांनी १९५५ मध्ये चापोली ते कपिलधार या महापदयात्रेचा प्रारंभ केला. भक्ती, साधना आणि गुरुभक्तीचा संदेश देणारी ही परंपरा आजही लाखो भाविकांच्या सहभागातून अखंड सुरू आहे. सन २००० पासून राष्ट्रसंतांच्या अहमदपूर येथील संजीवन समाधीस्थळ असलेल्या भक्तिस्थळापासून चापोलीमार्गे श्रीक्षेत्र कपिलधार अशी या यात्रेची परंपरा विकसित झाली.

यंदा या पदयात्रेचे ७२ वे वर्ष असून,



पदयात्रेत तब्बल ६७ दिंड्यांचा सहभाग आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा येथून हजारो भाविक पायी चालत या यात्रेत सहभागी होतात. विविध भागांतून निघणाऱ्या दिंड्या एकत्र येतात आणि मन्मथ माऊलींच्या दर्शनासाठी भक्तिभावाने कपिलधार येथे दाखल होतात.

शिवाचार्य महाराजांच्या दिंड्यांनी वाढविली यात्रेची आध्यात्मिक शोभा.!

या महापदयात्रेत अनेक शिवाचार्य महाराजांच्या दिंड्या सहभागी होतात. शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर, करबसव शिवाचार्य महाराज वसमत, थोरला मठ वसमत, गडगा मठ, राजलिंग शिवाचार्य महाराज परांडकर, धारेश्वर करमट, जवळा मठ तेलंगणा यांसह महाराष्ट्र आणि इतर राज्यांतील अनेक संत-महंतांच्या दिंड्यांनी यात्रेची आध्यात्मिक शोभा वाढविली.

आठ दिवस चालणाऱ्या या पदयात्रेत भाविकांचा उत्साह, शिस्त, सेवाभाव आणि गुरुभक्ती अनुभवायला मिळते. वयोवृद्धांपासून तरुणांपर्यंत आणि महिला भाविकांपासून लहान मुलांपर्यंत सर्वजण श्रद्धेने या पदयात्रेत सहभागी होतात. पायातील थकवा, प्रवासातील अडचणी आणि शारीरिक कष्ट यांवर मात करीत भाविक मन्मथ माऊलींच्या दर्शनासाठी मार्गक्रमण करतात.

कीर्तनाने यात्रेची सांगता; परंपरेचा आध्यात्मिक वारसा पुढे.!

कार्तिक पौर्णिमेला मन्मथ माऊलींच्या साक्षात्कार दिनानिमित्त कपिलधार येथे यात्रेचा मुख्य सोहळा पार पडतो. पूर्वी राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या कीर्तनाने या यात्रेची सांगता होत असे. तीच परंपरा कायम राखत मागील सहा वर्षांपासून त्यांचे उत्तराधिकारी राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या कीर्तनाचे आयोजन केले जाते. यंदाही सायंकाळी ९ ते रात्री ११ या वेळेत त्यांचे कीर्तन संपन्न झाले. कीर्तनातून संतविचार, अध्यात्म, गुरुभक्ती आणि समाजप्रबोधनाचा संदेश देण्यात आला. त्यानंतर पदयात्रेची परतीची वाटचाल सुरू झाली.

या सोहळ्यात सहभागी होण्याचे भाग्य लाभल्याचा मनस्वी आनंद व्यक्त करत उपस्थित मान्यवरांनी मन्मथ माऊलींच्या चरणी नतमस्तक होऊन सर्व भाविकांच्या सुख, शांती, आरोग्य आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली.

कपिलधारची ही महापदयात्रा म्हणजे केवळ धार्मिक सोहळा नाही, तर अनेक पिढ्यांना जोडणारी श्रद्धेची परंपरा आहे. संतांचे विचार, भक्तीचा मार्ग, सामाजिक समरसता आणि मानवतेचा संदेश घेऊन चालणारी ही पदयात्रा आजही लाखो भाविकांच्या मनात श्रद्धेचा दीप प्रज्वलित करीत आहे. काळ बदलला, पिढ्या बदलल्या, मात्र 'गुरुराज माऊली'वरील भक्ती आणि मन्मथ माऊलींच्या दर्शनाची ओढ आजही तितकीच अढळ आहे. हाच या ऐतिहासिक यात्रेचा खरा आध्यात्मिक वारसा आहे.

माय भारतच्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत साने गुरुजी विद्यालयाचे वर्चस्व

खो-खो, कबड्डी, लांब उडी व धावण्याच्या स्पर्धेतही खेळाडूंची चमकदार कामगिरी

केज/प्रतिनिधी

ग्रामीण भागातील युवकांच्या क्रीडा गुणांना व्यासपीठ मिळावे, त्यांच्यातील सुप्त क्रीडा कौशल्यास प्रोत्साहन मिळावे आणि खेळातून खिलाडूवृत्ती, आत्मविश्वास व संघ भावना विकसित व्हावी, या उद्देशाने भारत सरकारच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालया अंतर्गत कार्यरत माय भारत केंद्र (जिल्हायुवा अधिकारी कार्यालय, बीड) यांच्या वतीने दि. २५ नोव्हेंबर रोजी केज येथील साने गुरुजी निवासी विद्यालयात तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेत १५ ते २९ वयोगटातील युवक – युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपले क्रीडाकौशल्य दाखवले. या कार्यक्रमा साठी जिल्हा युवा अधिकारी सागर उज्जैनकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळाचे अध्यक्ष अड. उद्धव अण्णा कराड होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून केज पंचायत



समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या प्राचार्य डॉ.कविताताई गित्ते- कराड,युथ आयकॉन साक्षीताई कराड आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई केज तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील उपस्थित होते. मान्यवरांच्या स्वागता नंतर मुलींच्या खो-खो सामन्याने स्पर्धेचे उत्साहात उद्घाटन करण्यात आले.या स्पर्धेत कबड्डी,खो-खो, १०० मीटर धावणे आणि लांब उडी अशा विविध क्रीडाप्रकारांचा समावेश होता. खेळाडूंनी मैदानावर जिद्द, चिकाटी, वेग आणि कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. सर्व सामने अत्यंत उत्साहपूर्ण आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले.

स्पर्धेतील निकालात साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या खेळाडूंनी आपले वर्चस्व सिद्ध केले. खो-खो च्या मुली आणि मुलांच्या दोन्ही संघांनी प्रथम क्रमांक पटकावत दुहेरी यश संपादन केले. नरेंद्र मोदी परिचारिका संस्थेच्या मुलींच्या खो-खो संघाने द्वितीय क्रमांक मिळवला. कबड्डी मुलांच्या स्पर्धेत शंभुराजे वॉरियर्स संघाने प्रथम क्रमांक पटकावला. तर कबड्डी या खेळात साने गुरुजी निवासी उच्च माध्यमिक विद्यालय द्वितीय क्रमांक मिळवला तसेच १०० मीटर धावणे आणि लांब उडी या वैयक्तिक क्रीडा प्रकारात ही मुला-मुलींनी नेत्रदीपक कामगिरी करत आपल्या क्रीडागुणांची छाप पाडली.

या स्पर्धेमुळे अनेक नवोदित खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळाली. विजय मिळवणाऱ्या खेळाडूं सह सहभागी झालेल्या प्रत्येक खेळाडूने दाखव-लेली जिद्द आणि खेळ भावना कौतुकास्पद ठरली. अशा स्पर्धांमधून ग्रामीण भागातील खेळाडूंना राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर झेप घेण्याची प्रेरणा मिळते असे जिल्हा युवा अधिकारी सागर उज्जैनकर यांनी यावेळी बोलताना सांगितले. विजेत्या खेळाडू आणि संघाला सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

जिल्हाधीकारी व पोलीस अधीक्षकांचा वाळु माफीयाला दणका.!

गेवराई तालुक्यातील एका गुंडावर MPDA कायदद्यांतर्गत कडक कारवाई

बीड प्रतिनिधी :

सपोनि पो.स्टे. चकलांबा यांनी पोलीस अधीक्षक बीड यांचे मार्फतीने इसम नामे शेख अहमद शेख महंमद वय-४५ वर्षे रा. उमापुर ता. गेवराई जि.बीड याचे विरुद्ध प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावास दिनांक १२/११/२०२६ रोजी मा. श्री. विवेक जॉन्सन जिल्हाधीकारी बीड यांनी मंजुरी दिली होती. त्यावरुन सदर इसमास दिनांक २४/११/२०२६ रोजी पोलीस स्टेशन चकलांबा येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी ताब्यात घेऊन पो.स्टे. चकलांबा येथे हजर केल्याने सपोनि चकलांबा पोलीस स्टेशन यांनी सदर इसमास ताबे पोलीस मार्फत हर्सल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक २५/११/२०२६ रोजी हजर करुन स्थानबद्ध केले आहे. सदर स्थानबद्ध इसम नामे शेख अहमद शेख महंमद याचेविरुद्ध ६ गुन्हे दाखल असुन त्यामध्ये गौण खनिज वाळुची चोरी करणे, खुनाचा प्रयत्न करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, गंभीर दुखापत करणे, गैरकायद्याची मंडळी जमविणे, दंगा करणे, जातीवाचक शिवीगाळ करणे, वगैरे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. तसेच त्याचे विरुद्ध दिनांक १६/०९/२०२४ रोजी कलम १२९ भा.ना.सु.सं. प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. सदर कारवाईस तो जुमानत नव्हता. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी त्याला स्थानबद्ध करणे आवश्यक होते. त्यामुळे त्याचेवर सदरची कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.) अपर पोलीस अधीक्षक बीड श्री. समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी गेवराई श्री. अनिल कटके, पोनि स्था.गु.शा. बीड श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सचिन इंगळे, पोउपनिरी. गणेश कऱ्हाडकर, शेषांक पवार, पोह/८८४ नरेंद्र बांगर, पोह/४४६ विश्वनाथ प्रधान, पोह/७४३ राहुल नांगरे, पोना/१३२३ कैलास गुजर, पोअं/१५५९ संदीप गायकवाड, पोअं/९५७ मुकेश बनसोडे चकलांबा पोलीस स्टेशन, सपोउपनि. अभिमन्यू औताडे स्था.गु.शा. यांनी केलेली आहे.भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे, अवैध गुटखा विक्री करणारे, तसेच जातीय तथा धार्मीक तेढ निर्माण करणारे, समाजकंटक यांचेवर व दादागिरी करणाऱ्या खंडणी बहाद्दर, धोकादायक गुंडांवर, बेकायदेशीर जुगार, लॉटरी व हातभट्टीचे दारुचा व्यवसाय चालवणारे व्यक्तीवर जास्तीत जास्त व कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत (भा.पो.से.) यांनी दिले आहेत.

बीडमध्ये आज 'ऊर्जा आयुर्वेद क्लिनिक व पंचकर्म सेंटर'चा भव्य शुभारंभ

आमदार संदीप (भैय्या) क्षीरसागर यांच्या शुभहस्ते उद्घाटन, वैद्यकीय आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती

बीड प्रतिनिधी :

आयुर्वेद चिकित्सा आणि पंचकर्म उपचारांच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्यसेवेची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने बीड शहरात 'ऊर्जा आयुर्वेद क्लिनिक व पंचकर्म सेंटर'चा भव्य शुभारंभ गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १.३५ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या क्लिनिकचा शुभारंभ बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप (भैय्या) क्षीरसागर यांच्या शुभहस्ते होणार आहे. यावेळी ज्येष्ठ आयुर्वेद चिकित्सक वैद्य डॉ. शिवप्रसाद चरखा आणि ज्येष्ठ आयुर्वेद चिकित्सक डॉ. सचिन रेवणवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमाला बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, आमदार विजयराजे पंडित, माजी आमदार राजेंद्र जगताप, माजी आमदार उषाताई दराडे, प्रा. सुशिलाताई मारोळे, शिवसेना जिल्हा प्रमुख अनिल दादा जगताप, न प उपाध्यक्ष विनोद मुळूक, कुंडलिक खांडे, गणेश उगले, डॉ.सारिका क्षीरसागर, माजीमंत्री सुरेश नवले, रिपाईचे पप्पू कागदे, अँड.हेमाताई पिंपळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

ऊर्जा आयुर्वेद क्लिनिक व पंचकर्म सेंटरच्या माध्यमातून आयुर्वेद उपचारपद्धती आणि पंचकर्म चिकित्सा नागरिकांना उपलब्ध होणार आहे. आधुनिक जीवनशैलीमुळे उद्भ-वणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांवर पारंपरिक आयुर्वेद उपचारांची सुविधा मिळावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

या शुभारंभ सोहळ्यास नागरिक, आरोग्यप्रेमी आणि मान्यवरांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक कोंडीराम माणिकराव निंबाळकर, कमलताई कोंडीराम निंबाळकर, डॉ. पल्लवी कोंडीराम निंबाळकर (एम.डी. पंचकर्म) आणि दिग्विजय कोंडीराम निंबाळकर यांनी केले आहे.

कार्यक्रमाचे ठिकाण : ऊर्जा आयुर्वेद क्लिनिक, शिवतीर्थ निवास, बिंदुसरा कॉलनी, आदर्श नगर, राजमाता रोड, राजीव गांधी चौक, बीड.

ग्रामीण युवकांच्या उद्योजकतेला मिळणार नवी दिशा

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'चा आज संविधान दिनी शुभारंभ; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते योजनेचा होणार शुभारंभ

पुणे प्रतिनिधी

राज्यातील ग्रामीण भागातील युवक, युवती आणि शेतकऱ्यांना पशुधनाधारित व्यवसायांच्या माध्यमातून उद्योजक बनवून स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'चा शुभारंभ आज, गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर २०२६ रोजी संविधान दिनाचे औचित्य साधून मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. या योजनेच्या शुभारंभानंतर आज सायंकाळी ४ वाजेपासून महाडीबीटी २.० (२.०) पोर्टलवर ऑनलाइन अर्ज स्वीकारण्यास सुरुवात होणार आहे, अशी माहिती राज्याच्या पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी दिली.

या योजनेअंतर्गत अर्जदारांना त्यांच्या गरजेनुसार गाय व म्हैस पालन, शेळीपालन आणि कुक्कुटपालन तसेच व्यवसायासाठी आवश्यक पशुशेड व चारा यांसंबंधीचे घटक निवडण्याचे पर्याय ऑनलाइन अर्जामध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. महाआयटी आणि पशुसंवर्धन विभागाच्या समन्वयातून ही अत्याधुनिक ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. अर्जदाराने निवडलेल्या घटकांनुसार प्रकल्पाचा एकूण खर्च, त्यासाठी मिळणारे शासकीय अनुदान आणि लाभार्थ्याला भरावा लागणारा उर्वरित आर्थिक हिस्सा यांची स्पष्ट माहिती अर्ज भरतानाच ऑनलाइन प्रणालीवर उपलब्ध होणार आहे.

योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी ऑनलाइन अर्ज भरण्यापूर्वी आपापला फार्मर आयडी आणि महाआयडी तयार करून ठेवावेत, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे. लाभार्थ्यांची निवड 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वानुसार होणार असल्याने इच्छुकांनी लवकरात लवकर महाडीबीटी २.० पोर्टलवर ऑनलाइन अर्ज सादर करावेत. योजनेची सविस्तर माहिती आणि मार्गदर्शक सूचना पशुसंवर्धन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

योजनेबाबत काही शंका किंवा अडचणी असल्यास नागरिकांनी जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात अथवा पशुसंवर्धन विभागाच्या तालुका किंवा जिल्हास्तरीय कार्यालयाशी संपर्क साधावा. याशिवाय, पशुसंवर्धन विभागाच्या १९६२ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा किंवा ९०६३१४२२९९ या व्हॉट्सॲप चॅटबॉट क्रमांकावर संदेश पाठवावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे.

बाऱ्हाळी बसस्थानक परिसरात पिसाळलेल्या कुत्र्याचा हैदोस.!

तब्बल २० जणांसह दोन शेळ्यांना घेतला चावा.



मुखेड –बाऱ्हाळी प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी येथील जुन्या बसस्थानक परिसरात मंगळवारी (दि. २४) सायंकाळी सहाच्या सुमारास एका पिसाळ-लेल्या कुत्र्याने अक्षरशः धुमाकूळ घातला. बाजारासाठी आलेल्या तब्बल १६ जणांना तसेच दोन शेळ्यांना चावा घेतल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेत अनेकजण रक्तबंबाळ झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

बाऱ्हाळी जुना बस स्थानक परिसरात पिसाळलेल्या कुत्र्याने अचानक नागरिकांवर हल्ला केल्याने अनेकांना सावरण्याची संधीही मिळाली नाही. जखमींना तातडीने बाऱ्हाळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. मात्र, जखमांमधून रक्तस्राव झालेल्या रुग्णांवर आवश्यक उपचारांची सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांना पुढील उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय, मुखेड येथे पाठविण्यात आले. या हल्ल्यात चंद्रकांत वैजनाथ फुलारी, दिलीप तुकाराम जाधव, संजय धोंडीबा चव्हाण, जनार्दन केशव उमाटे, गणेश चंदर अस्वले, दिपाली आनंद कोतवाले, साधू रामदास बलुरे, शिवसांब काशिनाथ महाडिवाले, ज्ञानोबा वाडकर (सर्व रा. बाऱ्हाळी), कमलाकर तुकाराम इंगळे (हिप्पळनारी), सुरेश दत्ता जाधव, खाजासाब पिंजारी (निवळी), विकास गणपत जाधव (निमाजगा तांडा), आनंदा तोरणे (पेठवडज), राम पाटील (कलंबर) व लालबा कांबळे (भेंडेगाव) हे जखमी झाले आहेत. जखमी पैकी गणेश अस्वले यांच्या फेंड्रीला चावा घेतल्यामुळे मोठी जखम झाली आहे. विशेष म्हणजे, या पिसाळलेल्या कुत्र्याचा हल्ला थांबण्याचे नाव घेत नसून आणखी नागरिकांना चावा घेण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायत प्रशासन व पशुसंवर्धन विभागाने तातडीने दखल घेऊन पिसाळ-लेल्या कुत्र्याचा बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.

संपादकीय

विशेष वैचारिक अग्रलेख..

मोफत धान्याचा निर्णय स्वागतार्ह मात्र प्रश्नांवर कायमस्वरूपी उपाय कधी.?

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती पुन्हा एकदा चिंतेचा विषय बनली आहे. राज्य सरकारने ३३ जिल्ह्यांतील सुमारे ४२.३० लाख पात्र शेतकरी कुटुंबांना तीन महिने मोफत धान्य देण्याचा निर्णय घेतला आहे. दुसरीकडे बीड, धाराशिव, अहिल्यानगर, सांगली आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्ये फ्लॅश दुष्काळाचा धोका अधिक असल्याचे समोर आले आहे. या परिस्थितीकडे केवळ तात्पुरती समस्या म्हणून पाहून चालणार नाही.मोफत धान्याचा निर्णय गरजू कुटुंबांना दिलासा देणारा असला, तरी शेतकऱ्यांचे खरे प्रश्न त्यापेक्षा मोठे आहेत. पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा, शेतीचे नुकसान, कर्जबाजारीपणा आणि रोजगाराचा अभाव या संकटांवर ठोस उपाययोजना आवश्यक आहेत. शेतकऱ्याला धान्याबरोबरच जगण्यासाठी रोजगार आणि शेती टिकविण्यासाठी आर्थिक आधारही मिळाला पाहिजे.बीडसह मराठवाड्याने दुष्काळाचे चटके अनेकदा सहन केले आहेत. दरवर्षी टँकर, चारा छावण्या आणि मदतीच्या घोषणांभोवतीच दुष्काळाचे राजकारण फिरताना दिसते. मग कायमस्वरूपी जलसंधारणाचे नियोजन कधी होणार ? गावातील पाणी गावात अडविणे, नद्या-नाल्यांचे पुनरुज्जीवन, शेततळी, भूजल पुनर्भरण आणि ठिबक सिंचनाला प्रोत्साहन देणे यावर गांभीर्याने काम झाले पाहिजे.

दुष्काळात प्रशासनाची खरी परीक्षा असते. शासकीय मदत वेळेत मिळाली पाहिजे, पीकविम्याचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले पाहिजेत, रोजगार हमीची कामे सुरू झाली पाहिजेत आणि जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित केली पाहिजे. केवळ बैठका, दौरे आणि आश्वासनांनी शेतकऱ्यांचे संकट संपणार नाही.दुष्काळ हा निसर्गाचा प्रकोप असू शकतो परंतु त्यातून निर्माण होणारी उपासमार आणि पाणीटंचाई कमी करणे ही शासनाच्या नियोजनाची जबाबदारी आहे. शेतकरी जगला तर गाव जगेल आणि गाव जगले तरच राज्याची अर्थव्यवस्था सक्षम राहील.

महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्याच्या घोषणा आता पुरे झाल्या.! शेतकऱ्यांना आश्वासनांचे गाजर नको, तर पाणी, चारा, रोजगार आणि आर्थिक मदतीचा ठोस आधार हवा. कारण दुष्काळावर मात करण्यासाठी केवळ आभाळाकडे पाहून चालणार नाही, तर जमिनीवर उतरून काम करावे लागेल.!

दैनिक समर्थ राजयोग । विशेष अग्रलेख

भारतीय संविधानाची वाटचाल.. (२६ नोव्हेंबर संविधान दिन)

भारतामध्ये वास्तव्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला हक्क आणि अधिकार संविधानामुळे मिळाले. तो सोन्याचा दिन म्हणजेच २६ नोव्हेंबर १९४९ होय. प्रत्येक नागरिकांनी स्वतः संविधान हातात घेऊन त्याचे काळजीपूर्वक वाचन करावे. संविधान कोणत्या एका धर्मासाठी नाही. सर्वांसाठीच ते आहे. हे सर्वांना माहिती करण्या साठी आजचा हा संविधान दिन देशभर साजरा केला जातो. भारताचा प्राण आहे संविधान म्हणून त्याला जाणून घ्या.

सर्व भारतीय समान आहेत.हे संविधानातून आपणास कळते. म्हणून त्याची सुरुवात आम्ही भारताचे लोक असे म्हणून केली आहे.त्यांचा सखोल इतिहास खालील लेखातून आपण समजून घेऊया.. भारतीय संविधान देशाच्या एकात्मतेला व एकतेला बळकटी देणारा ग्रंथ आहे. हा ग्रंथ मानवतावाद व स्वाभिमान जागृत करणारा आहे. म्हणून प्रत्येक व्यक्तीने संविधान वाचावे व आपल्या घरी संग्रहित ठेवावे. व त्याचा दैनंदिन जीवनात आणि आचरणात वापर करावा.

प्रत्येक व्यक्तीला धर्म, लिंग, जन्मस्थान, वंश, यावर समानता दिलेली आहे. त्यांना कोणत्याही कारणावरून कमी लेखता येणार नाही.भारतीय संविधानामुळे प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र जीवन जगू शकतो.जगाच्या कानाकोपऱ्यात कोठेही राहू शकतो. कोणताही धर्म स्वीकारू शकतो. त्याच्या इच्छा नुसार शिक्षण घेऊ शकतो. हे सर्व संविधान ग्रंथात शिकायला मिळते.

भारतीय संविधान हा समाज तत्वाचा पाया आहे.

या संविधानामध्ये कोणत्याही धर्माला कमी लेखले नाही. किंवा कोणत्याही धर्माला अतिशय महत्त्व दिले गेले नाही. जुनाट रुढी, अनिष्ट परंपरा, अंधश्रद्धा यांना या ग्रंथात थारा नाही. सदसद विवेक बुद्धीने लिहिलेला हा अतिशय महत्त्वाचा ग्रंथ आहे. या ग्रंथातून मानवी विकास होतो. तो उन्नती कडे जाऊ शकतो. त्यांचा स्वाभिमान जागृत होतो. ज्ञान-विज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन, नैतिक मूल्ये या सर्व गोष्टीचा परिपूर्ण अभ्यास करणारा ग्रंथ म्हणजे भारतीय संविधान होय. शिक्षण घेण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीला आहे. धार्मिक स्वातंत्र्य प्रत्येक व्यक्तीला आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात हा ग्रंथ उपयोगी असणारा आहे. त्यामुळे संविधान सभेने म्हणजेच देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय राज्यघटना लिहिण्याची विनंती केली. त्यानुसार घटना समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ.राजेंद्र प्रसाद यांची निवड करण्यात आली. मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सर्वानुमते निवड केली. त्यानुसार दोन वर्षे १८ महिने ११ दिवस एवढ्या कालावधीत प्रचंड बौद्धिक परिश्रम करून हा ग्रंथ २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तयार झाला. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात नवचैतन्य निर्माण झाले. सर्वत्र समानता आली.प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळाला. त्यामुळेच संविधान आपल्या देशाचा आत्मा बनला; असला तरी आज सर्वत्र समानता दिसत नाही. याचे कारण काय? आज सुद्धा जातीयता दिसून येते.अनेक ठिकाणी दलितांवर हल्ले केले जातात. भारतीय संविधान असून सुद्धा असे जीवघेणे हल्ले का होतात. ?हेच कळत नाही.

संविधानाने समानता दिली असली तरी सर्वत्र समानता आजही दिसत नाही. श्रीमंत श्रीमंत होत चाललेत, अनेकांच्या पाचवीला गरीबी पुजलेली आहे. अशी उच्च-नीचता का निर्माण झाली. यावर ही चर्चा होणे गरजेचे आहे. दुर्बल घटकावर व महिलांवर वेळोवेळी अन्याय, अत्याचार केले जातात. यावर ठोस पावले उचलून कडक शिक्षा कराव्या लागतात.तरच संविधानाचे महत्त्व कळते. संविधान बाजूला सारून मनमानी करणे हे योग्य नाही.असे चालत राहिले तर संविधानाचा उपयोग होणार नाही. म्हणून सर्वांनीच संविधानाचा जागर केला पाहिजे. सर्वत्र संविधान दिन मोठ्या उत्साहात निर्माण करावा. आनंदाने त्यामध्ये सहभागी व्हावे. संविधानातील प्रत्येक कलमाचा अभ्यास केला जावा. छोट्या-मोठ्या कार्यक्रमातून इतर भेटवस्तू न देता संविधान ग्रंथ एकमेकांना भेट द्यावे. त्यामुळे संविधान घराघरात पोहोचेल. आणि संविधानात लिहीलेली कलमे सर्वांना माहीत होतील. प्रत्येक व्यक्तीच्या घरात संविधान असणे आवश्यक आहे. म्हणूनच संविधान हा आपल्या देशाचा आत्मा आहे.

भारतात अनेक भाषा बोलणारे लोक राहतात.भौगोलिक विविधते बरोबरच साहित्य, शिक्षण, इतिहास याबाबतीतही भारतात विविधता आहे. प्रत्येकालाच आपली भाषा, परंपरा, संस्कृती यांच्या विषयी आत्मीयता वाटते. या आत्मीयतेतूनच अस्मिता निर्माण झाली. म्हणूनच म्हटले जाते.आपल्या देशाची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधूता.. भारतीय संविधानात आहे. भारतीय संविधानाची वाटचाल २६ जानेवारी १९५० रोजी सुरू झाली. भारतीय प्रजासत्ताक लोकशाही व गणराज्य ही संविधानाची उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत. प्रत्येक नागरिकांना न्याय आणि स्वातंत्र्य देण्याबाबत संविधानात महत्त्वाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत.संविधान हे सामाजिक न्यायावर आणि समतेवर आधारलेला महत्त्वाचा ग्रंथ आहे. लोकशाही प्रत्यक्ष अंमलात आली तरच समाज जीवनाचे एक अविभाज्य अंग संविधान बनते. लोकसभेत, विधानसभेत, स्थानिक शासन संस्थांमध्ये निवडणूक द्वारे थेट प्रतिनिधित्व देण्याचे काम भारतीय लोकशाही करते. भारतीय संविधानाने प्रौढ मताधिकार पद्धतीचा स्वीकार केला. मतदानासाठी असलेली वयाची पात्रता २१ वरून १८ वर्षावर आणले. त्यामुळे प्रत्येक युवा वर्गाला मतदानाचा हक्क मिळत आहे. भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे. केंद्र शासन राज्य शासन आणि स्थानिक शासन संस्था या संविधाना कडून सत्तेचे विभाजन केले गेले. भारतीय लोकशाही करण व्हावे, म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात अनेक सुधारणा झाल्या. सामाजिक न्याय व समता या मूल्यावर आधारित नव्या समाजाची निर्मिती करणे.

हे संविधानाचे उद्दिष्टे आहे. अनुसूचित जाती व जमातीसाठी शिक्षण व सरकारी क्षेत्रात राखीव जागा ठेवण्यात आल्या. म्हणूनच संविधानाची वाटचाल अतिशय पारदर्शक पध्दतीने संविधानात आणली आहे. म्हणून ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीने स्थानिक शासन संस्थांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के राखीव जागा ठेवण्यात आल्या. महाराष्ट्र सह १५ राज्यात ही संख्या ५०% ठेवण्यात आली. महिला वरील अत्याचार निर्मूलना साठी राष्ट्रीय आणि राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. संविधानाची वाटचाल झाल्यामुळे मानवी जीवनाला स्थैर्य लाभले. म्हणूनच आज दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत. हे प्रत्येक नागरिकांनी आपल्या लक्षात ठेवावे. व आपले वागणे,जगणे, बोलणे समाज हिताचे असावे. सर्वांना विकासाची समान संधी मिळावी ,व्यक्ती म्हणून सर्वांचा दर्जा समान असावा, भारतीय लोकशाहीची व्याप्ती वाढावी, प्रत्येक मताला समान किंमत असावी, संविधानातील तरतुदी मध्ये बदल करताना मूळ चौकटीला कदापि धक्का लागणार नाही. याची दक्षता सर्वांनी घ्यावी.

ही अपेक्षा..

शब्दांकन...

कलम रत्न प्रा. विठ्ठल लक्ष्मीबाई गणपतराव बरसमवाड
संस्थापक, विठू माऊली प्रतिष्ठान खैरकावाडी मुखेड जि. नांदेड

धम्मजीवनातील बांधिलकी हीच बौद्ध व्यक्तीची खरी ओळख- धम्मचारी विनयरक्षित



नांदेड जिल्हा प्रतिनिधी- कृतज्ञतेचा गुण जोपासणे, दीक्षेचा खरा अर्थ समजून घेणे व स्वीकारलेल्या धम्ममार्गाशी आयुष्यभर बांधील राहणे, हीच धम्मजीवनाची खरी ओळख आहे, असे प्रतिपादन धम्मचारी विनयरक्षित यांनी केले. त्रिरत्न बौद्ध महासंघाच्या वतीने कार्तिकी पौर्णिमेनिमित्त २४ नोव्हेंबर रोजी नांदेड येथे धम्ममित्रांसाठी आयोजित मित्र पुनर्निश्चय समारंभात ते बोलत होते.

बौद्ध व्यक्तीचा सर्वांत महत्त्वाचा गुण म्हणजे कृतज्ञता होय. अगदी छोटीशी मदत करणाऱ्या व्यक्तीप्रतीही कृतज्ञतेची भावना असली पाहिजे. पौर्णिमा, सण-उत्सव आणि जयंती साजरी करण्यामागे कृतज्ञता व्यक्त करणे, ऋण मान्य करणे तसेच पुण्यानुमोदन करणे हा मुख्य उद्देश असतो, असे त्यांनी सांगितले.

मित्रदीक्षा म्हणजे केवळ नावापुढे धम्ममित्र ही पदवी लावणे नव्हे, तर स्वीकारलेल्या प्रतिज्ञा प्रत्यक्ष आचरणात आणणे होय. दैनंदिन जीवनातील धावपळीत ध्यानसाधना व धम्माचरणाचा विसर पडू नये. अत्त दीप भव ही संकल्पना आत्मसात करून विचार, भावना आणि कृती विमुक्तीच्या दिशेने वळवाव्यात, असे आवाहन धम्मचारी विनयरक्षित यांनी केले.

यावेळी धम्मचारिणी रत्नलोचना यांनी कार्तिकी पौर्णिमेचे बौद्ध इतिहासातील महत्त्व विशद केले. भगवान बुद्धांनी ६० भिक्खूंना धम्मप्रसारासाठी विविध दिशांना पाठविल्याचा ऐतिहासिक प्रसंग, सारिपुत्त यांचे परिनिर्वाण तसेच कठीण चीवरदानाची परंपरा यांचा उल्लेख करत त्यांनी धम्मप्रसार व संघभावनेचे महत्त्व सांगितले.

याप्रसंगी धम्ममित्रांनी तथागत भगवान गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भंते उर्गेन संरक्षित यांच्या प्रतिमांना दीप, धूप व पुष्प अर्पण करून बुद्ध, धम्म आणि संघाप्रती कटिबद्ध राहण्याचा पुनर्निश्चय केला. यावेळी सप्तांग पूजा व गाथापठण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धम्मचारी विद्याघोष यांनी केले. यावेळी धम्मचारिणी दानदीपा, धम्मचारी वज्रघोष, धम्मचारी करुणाध्वज यांच्यासह धम्ममित्र व धम्मसहायक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी धम्ममित्र शिलाताई चावरे व आशाताई घोडगे यांच्या वतीने उपस्थितांना खीरदान करण्यात आले.

उमरीचे सरपंच पुत्र अमोल मुळे यांच्यातर्फे मोफत पाणी पुरवठा, उमरी ग्रामस्थांची पाण्यासाठी होणारी पायपीट थांबली



केज/प्रतिनिधी:पाऊस कमी पडल्या मुळे गेल्या अनेक दिवसापासून उमरी या गावात पाण्याची तीव्रत्ता भासत होती. गावातील ग्रामस्थांना दोन-दोन किलोमीटर अंतरा वरून उन्हा तान्हात पाण्यासाठी भटकंती करावी लागत होती.

या बाबत सविस्तर वृत्त असे की, केज तालुक्यातील उमरी या गावात पाण्यासाठी ग्रामस्थाना रानोमाळ भटकंती करावी लागत होती, ही परिस्थिती पाहून गावच्या सरपंच सौ.सुमनताई मुळे यांचे चिरंजीव समाजसेवक अमोल भैय्या मुळे यांनी स्वखर्चाने टँकर द्वारे मोफत पाणी पुरवठा केला आहे. यामुळे गावकऱ्यांची पाण्यासाठी होणारी पायपिटी थांबणार आहे. या प्रसंगी उपसरपंच बाळासाहेब सावंत, ग्रामपंचायत सदस्य राजेभाऊ अंबादास मुळे, सुशेन अंकुशराव मुळे, गोकुळ मुळे, आबासाहेब मुळे, विश्वनाथ मुळे, अविनाश कसबे, अंकुश सोनवणे, विजय कसबे, गोकुळ मोरे, तसेच पोलीस पाटील सोनू सावंत, ज्येष्ठ नागरिक बापू सर मुळे, पांडुरंग यादव, मनोहर भैरट, दत्तात्रय चाळक, बबन महाराज पुरी, बंडुराव मुळे, माजी चेअरमन दत्तात्रय मुळे, मारुती यादव, दशरथ बाबा मुळे, नाना मुळे व सर्व गावकरी उपस्थित होते.

डिघोळआंबा शिवारातील कोरड्या तलावात अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळला!५० ते ५५ वयोगटातील व्यक्तीची ओळख पटविण्याचे युसूफ वडगाव पोलिसांचे आवाहन ; नागरिकांनी संपर्क साधण्याचे आवाहन

केज/प्रतिनिधी

केजअंबाजोगाई परिसरात खळबळ उडवणारी घटना समोर आली असून, युसूफ वडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे डिघोळआंबा शिवारात कळंब अंबाजोगाई राज्य महामार्गालगत असलेल्या कोरड्या तलावामध्ये एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला आहे. अंदाजे ५० ते ५५ वर्षे वयोगटातील या व्यक्तीची अद्याप ओळख पटलेली नसून संबंधित व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी युसूफ वडगाव पोलिसांनी नागरिकांना पुढे येण्याचे आवाहन केले आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर मृत व्यक्तीच्या अंगात पांढऱ्या रंगाचा फाटलेला व अर्धवट जळालेला सदरा होता. तसेच ग्रे रंगाची चड्डी असून, त्यावर काळ्या व पिवळ्या रंगाचे पट्टे आहेत.चड्डीला लाल रंगाच्या कापडाचे ठिगळ लावलेले आहे. व्यक्तीच्या कमरेला लाल रंगाचा करदोडा असून, त्याला काळ्या, पांढऱ्या व पोपटी रंगाच्या तीन चाव्या असलेला दोर बांधलेला आढळून आला आहे.

याशिवाय मृतदेहाच्या बाजूला काळ्या रंगाच्या चामड्याच्या शूजची जोडी आढळली आहे. तसेच लाल चौकडीचा रुमाल असून, त्यामध्ये डेटॉल व मेडिमिक्स साबण आढळून आले आहेत. या वस्तूंच्या आधारे संबंधित व्यक्तीची ओळख पटविण्याचा प्रयत्न पोलीस करीत आहेत.

ओळख पटविण्यासाठी पोलिसांचे आवाहन

सदर वर्णनाशी मिळती जुळती व्यक्ती आपल्या गावातून, परिसरातून किंवा कुटुंबातून बेपत्ता झाली असल्यास नागरिकांनी तातडीने युसूफ वडगाव पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा,असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे यांनी केले आहे. या व्यक्तीची ओळख पटविण्या साठी नागरिकांनी दिलेली माहिती पोलिसांसाठी महत्त्वाची ठरू शकते. त्यामुळे कोणाकडेही संबंधित व्यक्तीबाबत माहिती असल्यास ती पोलिसांना कळवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

संपर्कासाठी मोबाईल नंबर पुढीलप्रमाणे आहेत:

-९७३०९३४४१४
-९२२५०९२८३७

संदीप मांजरमे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन युसूफ वडगाव. अनोळखी मृत व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन युसूफ वडगाव पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

मल्टी कमोडिटी एक्सचेंज एम.सी. एक्स.मार्फत लोकसेवा नर्सिंग स्कूल बीड येथे स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम संपन्न

बीड/प्रतिनिधी

दिनांक २५ नोव्हेंबर २०२६ रोजी भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच मल्टी कमोडिटी एक्सचेंज एम.सी. एक्स.मार्फत लोकसेवा नर्सिंग स्कूल बीड येथे एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम नरसिंगच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या डायरेक्टर श्रीमती सुरभी वनवे मॅडम यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून (सेबी) तसेच एम.सी. एक्सचे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.



यात त्यांनी विद्यार्थ्यांना फायनान्शियल मार्केट्स, कमोडिटीचे प्रकार,जागतिक स्तरा वर सक्रिय असलेल्या कमोडिटीज,वेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट रेग्युलेशन ॲक्ट, कमोडिटी व इक्विटी मध्ये असेल असलेला फरक, डिमॅट अकाउंट, तसेच सेबीच्या सारथी ॲप चे महत्त्व विशद करत मार्गदर्शन केले. तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रा. प्रितेश रोहित सर अजय पुणेकर सर व सर्व स्टाफने विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन केले तर सूत्रसंचालन ओ.एस.सीमा शिरसाट मॅडम यांनी केले या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष श्री.गोविंद वनवे यांनी कौतुक केले.

माता रमाई बौद्ध विहाराच्या जागेप्रश्नी प्रशासनाची तात्काळ दखल; नगरपंचायतीचा प्रस्ताव तहसीलदार यांच्याकडे रवाना!

दिपक कांबळे यांचा पाठपुरावा सुरूच; ३० नोव्हेंबर पासून आंदोलनाचा इशारा



केज/प्रतिनिधी

केज शहरातील केज- बीड महामार्गालगत गट क्रमांक ३०/२ मधील गायरान जमिनी पैकी २० गुंठे जागा माता रमाई बौद्ध विहारासाठी आरक्षित करून मिळावी,या मागणीला आता प्रशासकीय स्तरावर हालचाल सुरू झाली आहे.दलित नेते तथा माता रमाई बौद्ध विहार कृती समितीचे दिपक कांबळे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची नगर पंचायत प्रशासनाने गंभीर दखल घेत संबंधित जागा आरक्षित करण्या बाबतचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी तहसीलदार,केज यांच्याकडे पाठविला आहे.

यासंदर्भात दि. २३ नोव्हेंबर २०२६ रोजी दिपक कांबळे, अजय भांगे,दिलीप बनसोडे यांच्यासह अन्य बौद्ध अनुयायांनी नगरपंचायत प्रशासना कडे निवेदन सादर केले होते.केज-बीड महामार्गावरील गट क्रमांक ३०/२ मधील २० गुंठे गायरान जागा माता रमाई बौद्ध विहारासाठी आरक्षित करून देण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली होती.

संबंधित जागेवर अनेक वर्षांपासून तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आलेली असून,दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त येथे विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यामुळे या जागेला बौद्ध समाजाच्या धार्मिक व सामाजिक जीवनात विशेष महत्त्व आहे. मात्र, अनेक वर्षां पासून जागेचा प्रश्न प्रलंबित असल्याने समाजामध्ये नाराजी व्यक्त केली जात होती.

या मागणी संदर्भात नगरपंचायत कार्यालयाने दि.२५ नोव्हेंबर २०२६ रोजी पत्र काढून गायरान जमिनीचे आरक्षण निश्चित करणे,वर्ग बदलणे अथवा सार्वजनिक प्रयोजना साठी जागा हस्तांतरित करण्याचे अधिकार महसूल विभागाच्या अखत्यारीत असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यानुसार गट क्रमांक ३०/२ मधील २० गुंठे जागा माता रमाई बौद्ध विहारासाठी आरक्षित व मंजूर करण्या बाबत चाप्रस्ताव तहसीलदार, केज यांच्याकडे पुढील योग्य कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे.

दरम्यान, मागणी मान्य न झाल्यास दि. ३० नोव्हेंबर २०२६ पासून आमरण उपोषण,साखळी उपोषण तसेच रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा कृती समितीच्या वतीने देण्यात आला आहे. प्रशासनाने या मागणी ची दखल घेऊन प्रस्ताव पुढे पाठविल्याने आंदोलना च्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे.मात्र,प्रस्ताव पाठविणे म्हणजे जागा प्रत्यक्ष आरक्षित झाल्याचा अंतिम निर्णय नसून, आता महसूल विभागाच्या पुढील कार्यवाहीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. माता रमाई बौद्ध विहाराच्या जागेचा प्रश्न मार्गी लागेपर्यंत दिपक कांबळे यांचा पाठपुरावा सुरूच राहणार असल्याची भूमिका कृती समितीने घेतली आहे.

सुजयदादा विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पारनेरमध्ये 'जलतारा' प्रकल्पाचा उत्साहात शुभारंभ!

विश्वनाथ कोरडे यांच्या संकल्पनेतून जलसंवर्धनाचा अभिनव उपक्रम भूजल पातळी वाढवून शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्याचा निर्धार

समर्थ राजयोग / श्रीनिवास शिंदे,

पावसाच्या पाण्याचे प्रभावी संवर्धन करून भूजल पातळीत वाढ करणे, शेतीसाठी सिंचनाची उपलब्धता वाढवणे आणि ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्याच्या उद्देशाने पारनेर तालुक्यात 'जलतारा' प्रकल्पाचा भव्य शुभारंभ उत्साहात पार पडला. अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच भाजप राज्य परिषद सदस्य विश्वनाथ दादा कोरडे यांच्या संकल्पनेतून हा जलसंवर्धनाचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी गणपती फाटा, कान्हूर-पारनेर रोड येथे सकाळी ९ वाजता या प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपचे अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीपराव भालसिंग होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ आणि पारनेर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

वर्षश्राद्धाच्या खर्चाला फाटा देत जलसंवर्धनासाठी निधी; विश्वनाथ कोरडे यांचा प्रेरणादायी संकल्प

यावेळी बोलताना विश्वनाथ दादा कोरडे म्हणाले की, पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजल पातळी वाढविणे ही आजच्या काळाची अत्यंत महत्त्वाची गरज आहे. जलतारा प्रकल्पाच्या माध्यमातून परिसरात जलसंधारणाला चालना मिळेल. याचा फायदा शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध होण्यासोबतच गावांमधील पिण्याच्या पाण्याची टंचाई कमी करण्यासाठी होईल.

विशेष म्हणजे, आपल्या आई-वडिलांच्या वर्षश्राद्ध कार्यक्रमावर होणारा अनावश्यक खर्च टाळून ती रक्कम जलतारा प्रकल्पांतर्गत खड्डे खोदण्यासाठी लागणाऱ्या इंधनावर खर्च करण्याचा संकल्प त्यांनी यावेळी जाहीर केला. सामाजिक बांधिलकी जपत जलसंवर्धनासाठी घेतलेला हा निर्णय उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.



राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमाला माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, भाजप जिल्हा सरचिटणीस सुभाषराव दुधाडे, जिल्हा बँकेचे माजी संचालक गणेश भालसिंग, सरपंच सिताराम नरवडे, प्रशांत गायकवाड, भाजप महिला जिल्हाध्यक्ष अश्विनीताई थोरात, सचिन वराळ पाटील, दिनेशराव बाबर, पंकज कारखिले, दत्ता नाना पवार, राष्ट्रवादी महिला तालुकाध्यक्ष सुषमा रावडे, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष दत्ता रोकडे, आरपीआय तालुकाध्यक्ष राजेंद्र उबाळे, नगर-सेवक युवराज पठारे, अशोकशेठ चेडे, माजी सरपंच गोकुळ मामा काकडे, सरपंच लहुशेठ बुचुडे, सोनालीताई सालके, सोनालीताई आंबेकर, लहुशेठ भालेकर, कल्याण थोरात, गोपीचंद बेलोटे, जयदीप सालके पाटील, निलेश शेळके, सरपंच विकास सावंत, उपसरपंच सागर व्यवहारे, कमलाकर बेलोटे मेजर, विश्वनाथ बेलोटे, बाबुराव मुळे, भाऊसाहेब बढे, पांडुरंग बढे, आप्पाभाऊ गोपाळे, अर्जुनराव नवले, रमेश गाडगे, कानिफनाथ ठुबे, मंगेश खोसे, विशाल लोंढे, सुयशराव वाळुंज, नवनाथ सालके, डॉ. सुरेश खणकर, दीपक रोहोकले, प्रसाद तोटे, चेअरमन प्रकाश ठाणगे, सरपंच भास्कर गव्हाणे, सरपंच आदेश परांडे, सीताराम देठे, अजिंक्य बेलोटे, संतोष सातपुते, अंकुश बुचुडे, शरद गोरे सर, शिवाजी शेळके सर, अरुण आढाव, अण्णा सालके, अनिलशेठ पठारे, गोपीशेठ घुले, नामदेवराव ठाणगे, पत्रकार सनी सोनावळे, प्रशांत झावरे पाटील, गणेश जगदाळे, राम तांबे, सतीश ठुबे, श्रीनिवास शिंदे, सखाराम भागवत, निलेश ठाणगे, संतोष मोहिते, मयुर ठाणगे, नाम फाउंडेशनचे विशाल नगरे, राह फाउंडेशनचे प्रशांत शिंदे, राजेंद्र पांढरे, दादाभाऊ ठुबे यांच्यासह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकसहभागातून जलसंवर्धनाची चळवळ उभी राहणार

जलतारा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी विश्वनाथ दादा युवा मंच, पारनेर तालुका यांच्या वतीने विशेष नियोजन व परिश्रम घेण्यात आले. तसेच करंदी, पुणेवाडी, वडझिरे, कान्हूर पठार येथील क्रिकेट व कबड्डी संघटना, विविध कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी या उपक्रमाला सहकार्य केले.

केवळ एका कार्यक्रमापुरता मर्यादित न राहता लोकसहभागातून जलसंवर्धनाची व्यापक चळवळ उभी करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व ओळखून त्याचे जतन करण्यासाठी सुरू झालेला हा उपक्रम पारनेर तालुक्यातील शेती आणि पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर दीर्घकालीन उपाययोजना उभी करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

नरोबा देवस्थान जुना कौठा नांदेड सामुदायिक तुळशी विवाह उत्साहात संपन्न, राधाकृष्ण सजिव देखावा

नवीन नांदेड -कार्तिक मास काकडा सांगता निमित्ताने सामूदायीक तुळशी विवाह सोहळा २४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता सुमधुर संगितात उत्साह संपन्न झाला यावेळी मंगलाष्टके व फटाक्यांच्या आतिषबाजी व महाआरतीने या सोहळ्याची सांगता झाली,या सोहळ्यात तुलशी उत्कृष्ट सजावट करणाऱ्या भगिनींना पारितोषिक देण्यात आली तर राधाकृष्ण सजिव देखाव्यांला रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी कार्तिक मासानिमित्त काकडा सांगता व सामूहिक तुळशी विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता,

या सामुदायिक तुलसी विवाहात जवळपास अकरा महिला भगिनींनी उत्कृष्ट सजावट करून तुळशी वृंदावन सह आकर्षक आणल्या होत्या तर राधाकृष्ण भुमिका परिसरातील जवळ पास विस बालकांनी उत्कृष्ट सजावट करून भुमिका केली.



यावेळी संगीत कार्यक्रम सोहम संगीत संच यांच्या सुमधुर भावगित व भक्ती गीतांनी उपस्थित मान्यवर व भाविक भक्त गहिवरून गेले होते, यावेळी व्यंकटेश मुळी, पप्पू गुरू, व बालाजी मंदिर विकास नगर कौठा मुख्य पुजारी तिवारी यांनी मंत्रोच्चार व मंगलाष्टके सादर केली.

या सोहळ्याला नावामनपाच्या महिला बालकल्याण सभापती सौ.सदिच्छा वैजु सोनी, माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे, भाजपा नगरसेविका सौ.अनुराधा राजु पाटील काळे, श्रीमती सुलोचना धोडीबाराव काकडे, वैशाली काकडे यांच्या सह सेवानिवृत्त उपनिरीक्षक उत्तम वरपडे, व मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी भाजपा नगरसेविका सौ अनुराधा राजु पाटील काळे यांच्या वतीने उत्कृष्ट तुळशी सजावट प्रथम लता शिंदे, व्दितीय यमुनाबाई वड्डे तृतीय सुप्रिया मार-लेवार, यांना पारितोषिके उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली तर राधाकृष्ण भुमिका बजावलेल्या अनेक बालकांना व मुली मुलांना मुख्य पुजारी व्यंकटेश मुळी गुरू यांच्या वतीने रोख रक्कम देऊन सन्मान करण्यात आला.

हा सोहळा यशस्वीतेसाठी श्री लक्ष्मी नृसिंह नरोबा मंदिर संस्थान, बसवेश्वर नगर, जुना कौठा नांदेड पदाधिकारी तथा आयोजक माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद धोंडीबाराव काकडे, अशोक दिल्लेराव, मार-ोती पासवाड, विनोद काकडे, राम येरमवार, व काकडा महिला मंडळ जुना कौठा, नांदेड यांनी परिश्रम घेतले, कार्यक्रमा नंतर उपस्थित भक्तांसाठी अल्पोपहार व्यवस्था करण्यात आली.

अनाठायी खर्चाला फाटा देत जुना कौठा येथील आगीमुळे जळालेल्या सचिन गारमेटंला नृसिंह मित्र मंडळाने केली आर्थिक मदत..

नवीन नांदेड - नृसिंह मित्र मंडळ पदाधिकारी यांनी सामुदायिक तुळशी विवाह प्रसंगी अनाठायी खर्चाला बगल देत जुना कौठा साईबाबा कमान रोडवरील सचिन गारमेटंला लागलेल्या आगीत दुकान जळुन खाक होऊन पाच कोटी रुपये नुकसान झालेल्या सचिन कुरडे याला आर्थिक मदत करून सहकार्य केले असुन या मित्र मंडळ उपक्रमाचे उपस्थितीनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.



जूना कौठा नांदेड येथील नृसिंह देवास्थानाचे भक्त असलेल्या सचिन कुरडे यांचें साईबाबा कमान वसरणी रोडवर सचिन गारमेटं होलसेल व्यापारी दुकान असुन दिवाळी मध्ये ९ नोव्हेंबर रोजी रात्री १ दरम्यान शार्ट सर्किट मुळे लागलेल्या आगीत दुकान जळुन खाक होऊन पाच कोटी रुपयांचा नुकसान झाले व परिव-ारातील सदस्यावर दुःखाचा डोंगर कोसळला.

जुना कौठा येथे दरवर्षी नृसिंह मंदिर कौठा येथे सामुदायिक तुळशी विवाह सोहळा धुमधडाक्यात साजरा करण्यात येतो परंतु यावर्षी अनाठायी खर्चाला फाटा देत साध्या पध्दतीने साजरा करण्यात आला यावेळी ढोल ताशांच्या गजर व जेवणाला व इतर अनेक गोष्टीना बगल देत साध्या पध्दतीने साजरा करून सचिन गारमेटंला आर्थिक मदत उपस्थित मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली यावेळी परिवारातील सदस्य यांच्यी मने गहिवरून आली.

नृसिंह मित्र मंडळ पदाधिकारी माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे, अशोक दिलेराव, मारोती पासवाड , विनोद काकडे व पदाधिकारी यांनी सहकार्य करून मदत केली या उपक्रमाचे अनेकांनी कौतुक करून मित्र मंडळ यांच्ये अभिनंदन केले आहे.

गावाच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामस्थांनी एकत्र यावे- गट विकास अधिकारी शेखर देशमुख



नांदेड जिल्हा प्रतिनिधी :- गाव स्वच्छ, शाश्वत व विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून समृद्ध करण्यासाठी ग्रामस्थांनी एकत्र येऊन सामूहिक प्रयत्न करावेत, असे आवाहन भोकर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी शेखर देशमुख यांनी केले.

भोकर तालुक्यातील खरबी येथे स्वच्छ शौचालय- गरिमामय भविष्य तसेच मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत त्यांनी आज गावाला भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातील गुणांकन व निकषांनुसार गावात राबविण्यात येत असलेल्या विविध विकासकामांची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी सार्वजनिक शौचालय तसेच शाळेतील स्वच्छता संकुलाचीही पाहणी करून स्वच्छतेच्या अनुषंगाने आवश्यक सूचना केल्या.

स्वच्छ भारत मिशनअंतर्गत गावातील वैयक्तिक, सार्वजनिक व संस्थात्मक शौचालये स्वच्छ व सुस्थितीत कार्यान्वित असणे आवश्यक आहे. याच उद्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या वतीने स्वच्छ शौचालय-गरिमामय भविष्य हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवावा. विशेषतः महिला, मुली आणि दिव्यांग व्यक्तींचा सन्मान जपत त्यांना सुरक्षित व स्वच्छताविषयक सुविधा उपलब्ध करून देणे, हा या अभियानाचा महत्त्वाचा उद्देश असल्याचे देशमुख यांनी सांगितले.

खरबी ग्रामपंचायतीने यापूर्वी स्मार्ट ग्राम तसेच धरती आबा अभियानांतर्गत तालुका स्तरावर उत्कृष्ट कामगिरी केली आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातही ग्रामपंचायतीने तालुका स्तरावर तृतीय क्रमांक मिळविला असून आता जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी ग्रामपंचायत सज्ज झाली आहे.

यावेळी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे माहिती, शिक्षण व संवाद तज्ज्ञ मिलिंद व्यवहारे, भगवानराव कल्याणकर, गट समन्वयक प्रदीप वाठोरे, ग्रामपंचायत अधिकारी जी. पी. वानखेडे, प्रतापराव कल्याणकर, राजू चेनेवाड, राजू मोरे, मुख्याध्यापक बाबुराव माडगे, संतोष सूर्यवंशी, बचत गटाच्या सीआरपी ज्योती भगत, विजय कल्याणकर, रतनबाई कल्याणकर, वर्षा बडबडकर आदी उपस्थित होते.

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .११३३/२०२६
इंदुबाई वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत ॲड एस.एस.ढोबळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **इंदुबाई भ्र.सुखदेव माने, रा.महांडुळा, ता.गे-वराई, जि. बीड ह.मु.बालमटाकळी, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, महांडुळा, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांच्या पती नामे सुखदेव पि.शंकर माने यांच्या दि.२१/०८/२००५ रोजीची** मृत्यु नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरजदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरजदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २०/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २४/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
श्री. रविंद्र अ.मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९५०/२०२६
उर्मीला भ्र. केशव खनपीट व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. पी.पी.रुईकर)

ज्याअर्थी मयत नामे **केशव मनोहर खनपीट,** हे / हया दिनांक **१९/०७/२०२६** रोजी **भोजगाव, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार

१ उर्मीला भ्र. केशव खनपीट, वय ४० वर्षे, धंदा-घरकाम, रा.भोजगाव, ता. गेवराई जि. बीड
२ प्रतिक पि. केशव खनपीट, वय २० वर्षे, धंदा-शिक्षण व शेती, रा.भोजगाव, ता. गेवराई जि. बीड
३ सत्यभामा भ्र.मनोहर खनपीट, वय ७५ वर्षे, धंदा-घरकाम, रा.भोजगाव, ता. गेवराई जि. बीड

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०२/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १५/१२/२०२६

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई
शिक्का
स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
श्री. रविंद्र अ.मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०६०/२०२६
मंगल भ्र.रमेश सोनवणे व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. एस.एल.कदम)

ज्याअर्थी मयत नामे **रमेश भगवान सोनवणे** हे / हया दिनांक ०९/१०/२०२६ रोजी **निपाणी जवळका, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार

१ मंगल भ्र.रमेश सोनवणे, वय ५७ वर्षे, धंदा-घरकाम, रा.निपाणी जवळका, ता. गेवराई, जि. बीड
२ विठ्ठल पि.रमेश सोनवणे, वय ३५ वर्षे, धंदा-शेती, रा.निपाणी जवळका, ता. गेवराई, जि. बीड

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २३/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- ०५/०१/२०२७

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई
शिक्का
स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
श्री. एच.एम.मोमीन सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०६७/२०२६
पद्माबाई व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. एस.एस.काळे)

ज्याअर्थी मयत नामे **कोंडीराम पि.रंभाजी तळेकर,** हे / हया दिनांक **२१/०१/२०२५** रोजी **मौजे मादळमोही, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार

१ पद्माबाई भ्र.कोंडीराम तळेकर, वय ७८ वर्षे, धंदा-सुखवस्तू, रा.मादळमोही, ता. गेवराई जि. बीड
२ विश्वंभर पि.कोंडीराम तळेकर, वय ५४ वर्षे, धंदा-शेती, रा.मादळमोही, ता. गेवराई जि. बीड
३ शोभा भ्र.राजेंद्र जाधव, वय ४८ वर्षे, धंदा-शेती, रा.भोगलगांव, ता. गेवराई जि. बीड
४ रुक्मीण भ्र.बाबासाहेब जाधव, वय ४६ वर्षे, धंदा-शेती, रा.भोगलगांव, ता. गेवराई, जि. बीड
५ मिना भ्र.बप्पासाहेब मोरे, वय ४२ वर्षे, धंदा-शेती, रा.तलवाडा, ता. गेवराई, जि. बीड

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २१/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- ०२/०१/२०२७

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई
शिक्का
स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
श्री. एच.एम.मोमीन सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०६५/२०२६
नवनाथ व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. एस.डी.सानप)

ज्याअर्थी मयत नामे **नारायण पि.संतु उर्फ संतराम बोंदरे** हे / हया दिनांक २९/०६/२०२६ रोजी **मौजे रोहीतळ, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार

१ नवनाथ पि.नारायण बोंदरे, वय ५० वर्षे, धंदा-शेती, रा. रोहीतळ, ता. गे-वराई, जि. बीड
२ निलावती भ्र.नारायण बोंदरे, वय ७५ वर्षे, धंदा-शेती व घरकाम, रा. रोहीतळ, ता. गेवराई, जि. बीड

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाण-पत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २१/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- ०२/०१/२०२७

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई
शिक्का
स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
श्री. रविंद्र अ.मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०५६/२०२६
मीनाबाई भ्र.सदानंद धुर्वे व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. जी.आर. शेंबडे)

ज्याअर्थी मयत नामे **सदानंद पि.भगवान धुर्वे,** हे / हया दिनांक २७/०३/२०२५ रोजी **खेर्डा बु., ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार

१ मीनाबाई भ्र.सदानंद धुर्वे, वय ५३ वर्षे, धंदा-शेती, रा.खेर्डा बु. पो.भेंडटाकळी, ता. गेवराई जि. बीड
२ ज्ञानेश्वर पि.सदानंद धुर्वे, वय ३६ वर्षे, धंदा-शेती, रा.खेर्डा बु. पो.भेंडटाकळी, ता. गेवराई जि. बीड
३ सर्वज्ञ पि.सदानंद धुर्वे, वय १८ वर्षे, धंदा-शेती, रा.खेर्डा बु. पो.भेंडटाकळी, ता. गेवराई जि. बीड
४ मुक्ता भ्र.प्रविण घोडके, वय ३३ वर्षे, धंदा-घरकाम, धाराशिव, ता.जि. धाराशिव
५ ज्योती भ्र.तुकाराम कानडे, वय २७ वर्षे, धंदा-घरकाम, रा.शिराळा, ता. परांडा, जि. धाराशिव
६ अर्चना भ्र. दिलीप गवळी, वय २४ वर्षे, धंदा-घरकाम, रा.नांदुरा, ता. नांदुरा, जि. बुलढाणा
७ वैष्णवी भ्र.रोहीत आडसुळ, वय २१ वर्षे, धंदा-घरकाम, रा.उंबरे कोटा. धाराशिव, ता.जि. धाराशिव

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाण-पत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २३/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- ०७/०१/२०२७

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई
शिक्का
स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
श्री. रविंद्र अ.मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०७२/२०२६
वर्षा भ्र.ईश्वर धावडे व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. आय.एस.धापसे)

ज्याअर्थी मयत नामे **शिवनाथ पि.बाबुराव काटकर,** हे / हया दिनांक **१५/०१/२०२२** रोजी **तळणेवाडी, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार

१ वर्षा भ्र.ईश्वर धावडे, वय २९ वर्षे, धंदा-शेती व घरकाम, रा. टेंबी आंतरवाली, ता. घनसांगवी, जि. जालना,

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाण-पत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २३/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- ०७/०१/२०२७

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई
शिक्का
स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
विविध वृत्त
गुरुवार दि. २६ नोव्हेंबर २०२६
Thursday, Dt. 26 November 2026
पान -४
PAGE - 4

मांडणी येथे गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी भव्य बुद्ध मूर्ती स्थापना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचा ऐतिहासिक अनावरण सोहळा



नायगाव/प्रतिनिधीः

नायगाव तालुक्यातील मांडणी येथील समाज बांधवांच्या आणि बौद्ध उपासक-उपासिकांच्या अथक परिश्रमातून अरहंत बुद्धविहार येथे जगाला शांतीचा संदेश देणाऱ्या तथागत भगवान बुद्धांच्या भव्य मूर्तीची स्थापना व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचा भव्य अनावरण सोहळा गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे.

या ऐतिहासिक सोहळ्याचे उद्घाटन राज्याचे सामाजिक न्यायमंत्री मा. संजय शिरसाट साहेब यांच्या शुभहस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते मा. सुरेशदादा गायकवाड साहेब राहणार आहेत. तसेच, नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खासदार खा. रविंद्र वसंतराव चव्हाण यांची प्रमुख पाहुणे म्हणून विशेष उपस्थिती लाभणार आहे.

या भव्यदिव्य कार्यक्रमास महाराष्ट्रातील आजी-माजी आमदार व राजकीय-सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची मांदियाळी उपस्थित राहणार आहे.

यामध्ये आंबेडकरवादी मिशनचे संस्थापक अध्यक्ष दिपक कदम सर, नायगाव विधानसभेचे आ.राजेश पवार, लोहा विधानसभेचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, विधानपरिषद सदस्य आ. हेमंतभाऊ पाटील, नांदेड उत्तर विधानसभेचे आ. बालाजी कल्याणकर, नांदेड दक्षिण विधानसभेचे आ.आनंदराव बोंढारकर, विजय दादा सोनवणे, मा.फारुख अहमद, शिवाभाऊ नरंगले, शेतकरी नेते मारोतरावजी कवळे गुरुजी, माजी शिक्षण सभापती शिवराज पाटील होटाळकर, मा.प्रा.मनोहरराव पवार, सिद्धांत संजय शिरसाट, सौ.वंदना मनोहरराव पवार, राजेश देशमुख कुंटूरकर, दिलीपराव धर्माधिकारी, बापुराव गजभारे, मा. राहुल प्रधान, विठ्ठल गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

तसेच, स्थानिक व जिल्ह्यातील मान्यवरांमध्ये श्रीनिवास पा. चव्हाण, रमेश सोनाळे, प्रशांतदादा इंगोले, माधवदादा जमदाडे, विजय पा. चव्हाण, डॉ. राजेश्वर पालमकर, निरंजना राजुभाऊ लांडगे, बालाजी बच्चेवार, हौसाजी वारघडे, संतोष दुंडे, भिमराव पवार, मालोजी झगडे, वसंत सुगावे, भि. ना. गायकवाड, देवराव सोनसळे, शिवानंद सोपनराव देवके, डॉ. शिवाजी कागडे, मनोजराव पाटील मोरे, बालाजी मेदेवाड, गौतम पवार, मोहनदादा लांडगे, अनिल कसबे, सतिष शिवाजीराव हणमंत, राहुलभाऊ सोनसळे, राजश्री कुलदिप राक्षसमारे, प्रकाश पोवाडे, राहुल गायकवाड, दिलीप सोंडारे, गावचे सरपंच एस. के. डुकूवाड, उपसरपंच राजीव आढाव, ग्रामविकास अधिकारी धनंजय केते यांच्यासह परिसरातील सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थ उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रभिम हवजारे आणि एम.टी.वाघमारे सर करणार आहेत.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष देविदास राक्षसमारे, उपाध्यक्ष प्रा. डॉ. आर. डी. राक्षसमारे, सचिव भगवान राक्षसमारे, सहसचिव साहेबराव राक्षसमारे, सदस्य धनाजी राक्षसमारे, सिद्धार्थ राक्षसमारे, गौतम आढाव, शेषराव राक्षसमारे, सुभाष राक्षसमारे, धम्मपाल राक्षसमारे, संतोष राक्षसमारे, सतिष राक्षसमारे, संदिप राक्षसमारे,धम्मदीप राक्षसमारे चंद्रप्रकाश राक्षसमारे, सुमेध राक्षसमारे संघदिप राक्षसमारे व समस्त गावकरी मंडळी मांढणी परिश्रम घेत आहेत.

तरी या मंगल सोहळ्याप्रसंगी सर्व आंबेडकरी अनुयायांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अरहंत बुद्धविहार समिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती व समस्त बौद्ध समाज, मांडणी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

दिवसभरातील कार्यक्रमाची रूपरेषा...

स.५:०० वा. परित्राणपाठ भदन्त संघपाल थेरो यांच्या हस्ते.,स.६:३० वा. पंचशील धम्म ध्वजाचे ध्वजारोहण पू. भदन्त डॉ. खेमधम्मो महाथेरो यांच्या शुभ हस्ते.,स.८:०० वा. भारतीय संविधान मिरवणूक.,सकाळी ८:३० वा. महाकारुणिक तथागत भगवान बुद्ध मूर्ती मिरवणूक व मूर्ती स्थापना.,स.११:०० वा. भिक्खूसंघास भोजनदान व त्यानंतर स.११:३० पासून आगमनापर्यंत सामुहिक भोजनदान सुरू राहणार आहे.

तर दुपारी १२:३० वा.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण. लागलीच दुपारी १:०० वा.भिक्खूसंघाचे स्वागत, चिवरदान व धम्मदेशना., दुपारी १:३० वा. मान्यवरांचे स्वागत व सत्कार सोहळा.,सायंकाळी ६:०० वा. आभार प्रदर्शन.,सायंकाळी ७:०० वा. सुप्रसिद्ध गायक भीमशाहीर माधवदादा वाढवे यांचा जाहीर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तरी नांदेड जिल्ह्यासह नायगाव तालुक्यातील जनतेनी सांस्कृतिक कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा आहे आव्हान आयोजक मंडळींनी केले आहे.

पाणीटंचाईचा आढावा बैठक आ. अंतापूरकर यांनी अधिकाऱ्यांना धरले धारेवर..

देगलूर तालुका पाणीप्रश्नासाठी साडेसहा तासांची मॅरेथॉन बैठक, गावागावांचा घेतला हिशेब, अधिकाऱ्यांना कामांच्या डेडलाइन



देगलूर । प्रतिनिधी

देगलूर-बिलोली मतदारसंघात संभाव्य पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्यापूर्वीच आ. जितेशजी अंतापूरकर यांनी प्रशासनाला कामाला लावले आहे. नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागू नये, एकाही गावाला टंचाईची झळ बसू नये आणि प्रत्येक गावातील पाणीपुरवठा सुरळीत राहावा, या उद्देशाने त्यांनी पंचायत समिती, देगलूर येथे तब्बल साडेसहा तासांची मॅरेथॉन आढावा बैठक घेतली. केवळ कागदी आढाव्यावर समाधान न मानता गावनिहाय प्रश्नांचा सखोल ऊहापोह, अधिकाऱ्यांची झाडाझडती आणि प्रत्येक कामासाठी कालमर्यादा निश्चित करण्यावर त्यांनी भर दिला.

पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर प्रशासनाची धावपळ सुरू होण्यापेक्षा संकट येण्यापूर्वीच त्यावर मात करण्याची तयारी असली पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका आमदार अंतापूरकर यांनी या बैठकीत मांडली. मतदारसंघातील प्रत्येक गावाची पाणीपुरवठ्याची गरज वेगळी असून, त्यानुसार स्वतंत्र आणि वास्तववादी नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

बैठकीत देगलूर तालुक्यातील गावनिहाय पाणीपुरवठा व्यवस्थेची सद्यस्थिती, उपलब्ध जलसाठा, विहिरी व जलस्रोतांची परिस्थिती, पाणीपुरवठा योजनांची कार्यक्षमता, बंद अथवा नादुरुस्त यंत्रणा, प्रलंबित कामे आणि आगामी काळात उद्भवू शकणाऱ्या संभाव्य अडचणींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ग्रामीण भागासोबतच देगलूर शहरातील पाणीपुरवठ्याच्या प्रश्नांनाही विशेष प्राधान्य देण्यात आले.

देगलूर तालुक्यातील प्रत्येक गावाचा पाणीप्रश्न स्वतंत्रपणे समजून घेत त्यावर नेमकी कोणती उपाययोजना आवश्यक आहे, कोणत्या विभागाने कोणती जबाबदारी पार पाडायची आणि संबंधित काम किती दिवसांत पूर्ण करायचे, यावर आमदारांनी अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना त्रास सहन करावा लागणार नाही, यासाठी प्रशासनाने आतापासूनच सज्ज राहावे. पाणीपुरवठ्याच्या कामात कोणत्याही प्रकारची हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही,' असा सज्जड इशाराही आमदार जितेशजी अंतापूरकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिला. पाणीटंचाईसारख्या संवेदनशील प्रश्नावर आमदारांनी सलग साडेसहा तास प्रशासकीय यंत्रणेसोबत बसून गावागावांतील परिस्थिती जाणून घेणे, ही या बैठकीची विशेष बाब ठरली. प्रत्येक गावाचा प्रश्न ऐकून घेणे, त्यावर उपाययोजना निश्चित करणे आणि संबंधित विभागाची जबाबदारी ठरवणे, या पद्धतीने बैठक पार पडली.या बैठकीस तालुक्यातील लोकप्रतिनिधी, संबंधित विभागांचे अधिकारी, ग्रामसेवक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवघा गावाची १३७ वर्षांची परंपरा कायम श्रद्धेची पालखी भक्तीचा सागर श्रद्धेची पालखी माणुसकीचा ठेवा आजही काय



मुदखेड प्रतिनिधी : काळ बदलला, पिढ्या बदलल्या; मात्र मातीतील श्रद्धेचा सुगंध आजही कायम आहे. निवघा ता. मुदखेड गावाने १३७ वर्षापासून कार्तिक यात्रेची परंपरा जपत भक्तीबरोबरच माणुसकीचा वारसाही जिवंत ठेवला आहे. श्री महारुद्र दक्षिणमुखी हनुमान आणि विठ्ठल - रुक्मिणी देवस्थानाच्या सान्निध्यात भरणारा हा महोत्सव म्हणजे धार्मिक श्रद्धा, कौटुंबिक नाती आणि सामाजिक एकात्मतेचा अनोखा संगम आहे. माहेरवाशिणींसाठी दुसरी दिवाळी सासर कितीही दूर असले, तरी कार्तिक यात्रेची चाहूल लागताच निवघ्याच्या लेकींची पावले माहेराकडे वळतात. देवदर्शन, नातेवाइकांच्या भेटी, बालपणीच्या आठवणी आणि गावच्या मातीची ओढ यामुळे ही यात्रा त्यांच्या आयुष्यात आनंदाची पर्वणी ठरते.

दोन कोटींचा सभामंडप; एकोप्याचे प्रतीक !

ग्रामस्थांनी दोन कोटी रुपये खर्चुन उभारलेला सभामंडप सामाजिक बांधिलकीची साक्ष देतो. सर्व धर्मातील कुटुंबांना नाममात्र शुल्कात विवाह सोहळे आयोजित करण्याची सुविधा येथे उपलब्ध आहे. गावात कोणताही धार्मिक, कौटुंबिक किंवा सामाजिक कार्यक्रम असो, ग्रामस्थ एकजुटीने सहभागी होतात. सामूहिक चुलीवर भोजन तयार करून एकत्र जेवण्याची परंपराही आजही कायम आहे.

युवकांनी जपला वारसा!

१३७ वर्षांची परंपरा नव्या पिढीनेही तितक्याच उत्साहाने पुढे नेली आहे. जात-धर्माचे भेद बाजूला ठेवून एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, हीच निवघ्याची खरी संस्कृती आहे. देवस्थानांची श्रद्धा, माहेरवाशिणींची ओढ आणि सर्वधर्मीयांची एकजूट यामुळे निवघ्याची कार्तिक यात्रा केवळ उत्सव न राहता माणुसकीचा जागर बनली आहे.

नांदेड जिल्ह्यामधील मुदखेड तालुक्यातील निवघा गावाची कार्तिकी यात्रा म्हणजेच या तालुक्याची जिल्ह्याची पंढरीच आहे असे समजले जातात.

सुंदरबाई वामनराव कुचेकर यांचे वयाच्या १०७ व्या वर्षी निधन



चौसाळा / प्रतिनिधी

चौसाळा येथील ज्येष्ठ मातृशक्ती सुंदरबाई वामनराव कुचेकर यांचे वयाच्या १०७ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

स्व. सुंदरबाई या समाजकार्यकर्ते तथा चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर यांच्या आजी होत्या. त्यांनी प्रदीर्घ आयुष्यात कुटुंबाला संस्कार, प्रेम आणि एकैचेची मूल्ये दिली. आपल्या साधेपणा, धार्मिक वृत्ती, कष्टाळूपणा आणि सर्वाशी जिव्हाळ्याने वागण्याच्या स्वभावामुळे त्या सर्वांच्या आदराच्या होत्या.त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे कुचेकर परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

त्यांच्या पार्थिवावर स्थानिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, ग्रामस्थ, सामाजिक, राजकीय व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.सामाजिक क्षेत्रात काम करणारे विवेक कुचेकर यांच्यावर या निधनामुळे मोठा दुःखाचा आघात झाला असून विविध स्तरांतून त्यांना सांत्वनपर संदेश येत आहेत.

कारवाई उमाटवाडी येथे जुगार अड्ड्यावर मुदखेड पोलिसांची धाड चार आरोपींसह, एक लाख ७६ हजारचा मुद्देमाल जप्त



मुदखेड / प्रतिनिधीः

नांदेड जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध विशेष मोहीम सुरू असून, याअंतर्गत मुदखेड पोलिसांनी उमाटवाडी शिवारात सुरू असलेल्या 'अंदर-बाहर' जुगार अड्ड्यावर छापा टाकून चार जुगाऱ्यांकडून रोख रक्कम आणि मोबाईल फोनसह एक लाख ७६ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मुदखेड पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांच्या आदेश व मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत होते. मौजे उमाटवाडी परिसरात पेट्रोलिंग सुरू असताना पोलीस पथकाला गोपनीय बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, उमाटवाडी गावच्या गायरान जमीनीत एका लिंबाच्या झाडाखाली काही इसम पैसे लावून 'अंदर-बाहर' नावाचा जुगार खेळत आहेत.

मिळालेल्या माहितीची खातरजमा करून पोलिसांनी दोन पंचांसमवेत रात्रीच्या सुमारास संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी काही इसम गोल रिंगण करून पत्ते आणि पैशांवर जुगार खेळताना दिसून आले. पोलिसांची चाहूल लागताच जुगार खेळविणारे काही इसम अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पळून जाण्यात यशस्वी झाले, मात्र पोलिसांनी घेराव घालून जगन सोमवारे (रा. येळी, ता.लोहा), भुजंग शिंदे (रा. रोही पिंपळगाव, ता.मुदखेड), संभाजी जाधव (रा. माळकौठा, ता. मुदखेड) आणि कृष्णा कल्याणे (रा. मुगट, ता. मुदखेड) या चार जणांना ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती व घटनास्थळाच्या पाहणीत रोख रक्कम सहा हजार ६,६०० रुपये, विविध कंपनीचे फोन एकूण अंदाजे किंमत १ लाख ७० हजार रुपये किंमतीचे आणि जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख ७६ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी आरोपी विरुद्ध मुदखेड पोलिस स्टेशन येथे गु. र. न २५२ / २०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम गुन्हा दाखल करण्यात सदर ची कार्यवाही डॉ नीलम रोहन पोलिस अध्यक्षक नांदेड यांच्या आदेशाने संदिप जाधव अपर पोलिस अधीक्षक, अर्चना पाटील अपर पोलीस अधीक्षक, माणिक बेंद्रे उपविभागीय पोलीस अधिकारी, मुदखेडचे कर्तव्य दक्ष पोलीस निरीक्षक गणेश कराड, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राजेश नंदे, सुरेश जाधव,आकाश सरोदे, पोलीस अमलदार महेंद्रकुमार कौठेकर, कदम चव्हाण यांच्या पथकाने पार पाडले.

अवैध जुगार मठका तसेच इतर बेकायदेशीर प्रकराविरुद्ध पोलिसांकडून सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. नागरिकांनी आशा प्रकारच्या अवैध हालचालीची माहिती पोलिसांना देऊन सहकार्य करावे असे आव्हान जिल्हा पोलिसांकडून करण्यात येत आहे.

इंग्रजांच्या राजवटीलाही लाजवेल असा हिमायतनगर नगरपंचायतीचा कारभार; स्वच्छतेचे तीनतेरा वाजल्याने प्रभाग १३ मधील जनता नरकयातनेत!

हिमायतनगर (प्रतिनिधी) :

हिमायतनगर शहरातील प्रभाग क्रमांक १३ मधील नागरिक सध्या अत्यंत विदारक आणि नरकयातनामय जीवन जगत आहेत. प्रभागात गेल्या अनेक वर्षांपासून नाली बांधकाम न झाल्यामुळे, तसेच नगरपंचायतीच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कमालीच्या निष्काळजीपणामुळे संपूर्ण प्रभागात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. नाल्यांचे काळेकुट्ट आणि सडलेले पाणी थेट रस्त्यावर वाहून नागरिकांच्या दारासमोर साचले आहे, तर उघड्या चेंबर आणि खड्ड्यांमध्ये हिरवे शेवाळ व प्लास्टिक कचऱ्याचे ढीग साचल्याने प्रभागातील रस्ते पूर्णपणे बंद झाले आहेत. श्रीमंतांसारखी भक्कम आरसीसी घरे नसलेल्या गोरगरिबांच्या साध्या घरांमध्येही हे दुर्गंधीयुक्त पाणी थेट शिरत असल्याने संसाराचे मोठे नुकसान होत आहे. या भयंकर परिस्थितीकडे प्रशासन जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याने, 'इंग्रजांच्या जुलमी राजवटी पेक्षाही भयानक कारभार हिमायतनगर नगरपंचायतीचा सुरू आहे,' असा संतप्त सवाल प्रभागवासीयांकडून उपस्थित केला जात आहे.



भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला स्वच्छ आणि सन्मानाने जगण्याचा मूलभूत अधिकार दिला आहे. लोकशाही व्यवस्थेत जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी नगरसेवक निवडून दिले जातात, प्रशासनावर अंकुश ठेवण्यासाठी मुख्याधिकारी असतात आणि शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी नगरपंचायत कर्मचाऱ्यांची असते. मात्र, प्रशासनाकडून घरपट्टी, नळपट्टी आणि इतर करांची नियमित वसुली करूनही प्रभागात मूलभूत सुविधांचा पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. 'सफाई कर्मचारी केवळ कागदोपत्री काम दाखवून पगार उचलत आहेत का?' असा सवाल नागरिक विचारत आहेत. 'येथे राहणारे लोक गरीब असल्यामुळेच प्रशासन जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहे; जर हीच परिस्थिती एखाद्या श्रीमंत वस्तीत असती, तर संपूर्ण नगरपंचायत प्रशासन धावत आले असते,' असा तीव्र संताप प्रभागवासीय व्यक्त करत आहेत.

रस्त्यावर साचलेल्या नाल्यांच्या दूषित पाण्यातून वाट काढताना शालेय विद्यार्थ्यांना मोठी कसरत करावी लागत असून, महिला व वयोवृद्धांना घराबाहेर पडणेही अशक्य झाले आहे. स्थानिक नगरसेवकांचेही या समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याने, साचलेल्या पाण्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला असून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या जीवघेण्या साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. नगरपंचायतीचे मुख्याधिकारी या प्रकरणी तात्काळ प्रत्यक्ष पाहणी करून कामचुकार कर्मचाऱ्यांवर कारवाई करतील का आणि स्वच्छता व नाली बांधकामाचे काम हाती घेतील का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची दखल घेऊन येत्या चार ते पाच दिवसांत प्रभागातील स्वच्छता व नाली बांधकामाची ठोस कार्यवाही सुरू न केल्यास, प्रभाग क्रमांक १३ मधील सर्व नागरिक संवैधानिक आणि लोकशाही मार्गाने थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेऊन तीव्र आंदोलन छेडतील, अशी जोरदार चर्चा सध्या लोकांमध्ये सुरू आहे.

रामभाऊ सगळे यांचे वृद्धापकाळाने निधन



चौसाळा / प्रतिनिधी

चौसाळा येथील ज्येष्ठ नागरिक रामभाऊ धोंडीबा सगळे यांचे दि.२३ नोव्हेंबर २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांचे वय ९१ वर्षाचे होते. कै. रामभाऊ सगळे हे जुने चौसाळा येथील वारकरी संप्रदायाचे सर्व परिचित होते. ते गेल्या दोन महिन्यापासून आजारी असल्याने त्यांचा उपचारादर म्यान वृद्धापकाळाने मृत्यू झाला. त्यांच्या मागे तीन मुले, एक मुलगी, सुना नातवंडे आदी परिवार आहे. त्यांच्या निधनाने गावात हळहळ व्यक्त होत आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 (MAHARSHTRA).